# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वर्ष ४५
अंक ५

वृत्त
|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मे २०२५
वैशाख/ज्येष्ठ
शके १९४७


नमस्कार मंडळी

२२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहेलगाम या ठिकाणी अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. बृहन्महाराष्ट्र मंडळ या हल्ल्याचा निषेध करीत असून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. कालच अक्षय्य तृतीया साजरी झाली. भगवान विष्णु यांचा सहावा अवतार असलेल्या परशुराम यांची जयंती पण याच दिवशी. परशुरामाने जसे दुष्टांचा नाश केला, त्याचप्रमाणे भारत भूमीला त्रास देणाऱ्या शक्तींचा भारतीय लष्कराकडून लवकरात लवकर नाश होवो हीच ईश्वराकडे प्रार्थना.

आज महाराष्ट्र दिन! जगभरातील माझ्या सर्व मराठी बंधू-भगिनींना हार्दिक शुभेच्छा. मराठी भाषा व संस्कृती परदेशात जपायची मोठी जबाबदारी आपण घेतली आहे आणि आपल्याकडून आपली पुढील पिढी त्यांच्या पुढील पिढीला हा वारसा नक्की देईल यात कोणतीही शंका नाही.



बृहन्महाराष्ट्र मंडळासाठी एप्रिल महिना धामधुमीचा होता. सर्वप्रथम डॅलस येथे भरलेला भव्यतम BMM Texas मैत्री मेळावा. १५०० हून अधिक लोकांनी विक्रमी उपस्थिती लावलेला हा आतापर्यंतचा सगळ्यात मोठा मैत्री मेळावा. प्रेक्षकांशिवाय कोणताही कार्यक्रम यशस्वी होणे शक्य नाही. या मैत्री मेळाव्याला उत्स्फूर्त पाठिंबा देणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो. मेळाव्यात भाग घेऊन विविधरंगी कार्यक्रम सादर करणाऱ्या डॅलस फोर्टवर्थ, ऑस्टिन, ह्युस्टन, व सॅन अँटोनियो मंडळातील कलाकारांचे अभिनंदन! डॅलस फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा, सौ. शामली असनारे, यांच्या नेतृत्वात या मैत्री मेळाव्याचे आयोजन झाले. त्यांना सहकार्य करणाऱ्या त्यांच्या समितीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे, तसेच तीनशेहून अधिक अशा स्वयंसेवकांचे मी आभार मानतो. दोन दिवस चाललेल्या या सोहळ्यात त्यांनी भरपूर कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या मैत्री मेळाव्याबद्दलची अधिक माहिती तुम्हाला या अंकात पुढे वाचायला मिळेलच. अशा प्रकारच्या मोठ्या मेळाव्यांचे आयोजन करणे म्हणजे जास्तीचा खर्च आलाच. हा जास्तीचा खर्च भरून निघतो तो मुख्यत्वे देणगीदार आणि प्रायोजकांच्या मदतीतूनच. मी या सर्व प्रायोजकांचे आणि देणगीदारांचे आभार मानतो. परत एकदा सुंदर अशा नियोजनाबद्दल डॅलस फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाच्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

“रेशीमगाठी” संकेतस्थळ आता कार्यान्वित झाले आहे. गेले अनेक महिने या संकेतस्थळाच्या नूतनीकरणाचे काम चालू होते. दरम्यानच्या काळात ज्या काही मंडळींची गैरसोय झाली, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, त्याचबरोबर गुणवत्ता चाचणी करणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे मी आभार मानतो.

एप्रिल महिन्यात बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून तीन समांतर दौरे चालू होते - “जर तर ची गोष्ट” हे नाटक, सुप्रसिद्ध वक्त्या सौ. धनश्री लेले, तसेच सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन यांची व्याख्याने. या तिन्ही कार्यक्रमांना प्रतिसाद देणाऱ्या सर्व मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि प्रेक्षक/श्रोते वर्गाचा मी खूप खूप आभारी आहे. समाजरंगतर्फे यजुर्वेंद्र महाजन यांचा दौरा जोरात चालू आहे. विशेष नमूद करायची गोष्ट म्हणजे शिकागो येथील कार्यक्रमात श्रोत्यांनी $२०,००० एवढा निधी उभा करण्याचे आश्वासन प्रतिज्ञा घेऊन दिले आहे. शिकागो मंडळाच्या अध्यक्षा सौ. नमिता वेदक व त्यांच्या कार्यकारिणीचे विशेष अभिनंदन!

उत्तररंग, मेडिटेशन, व समाजरंग या उपक्रमांतर्फे “मानसिक आजार" (Mental Weakness) या विषयावर अमेरिकेतील खासदार श्री ठाणेदार यांच्याबरोबर रविवार, १८ मे रोजी एक परिसंवाद आयोजित करीत आहोत. यावेळी त्यांचा “Dear Pra” हा लघु चित्रपट दाखवण्यात येणार असून त्यानंतर या विषयावर तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्यात येणार आहे, तरी या कार्यक्रमाला नक्की उपस्थित रहा.

मे महिना हा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळांच्या परीक्षेचा महिना. आम्ही यावर्षी भारती विद्यापीठ, तसेच महाराष्ट्र शासनाच्या (बालभारती) मराठी परीक्षा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देत आहोत. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा, तसेच या परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी गेले अनेक आठवडे काम करणाऱ्या सर्व शिक्षक व स्वयंसेवी पालकांचे आभार. जून महिन्यात आम्ही विद्यार्थ्यांसाठी Summer Internship त्याचप्रमाणे Study Abroad हे कार्यक्रम घेऊन येत आहोत. अधिक माहितीसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्या. www.bmmonline.org

लेखाची सांगता करण्याआधी येणाऱ्या Mother’s Day निमित्त सर्व मातांना शुभेच्छा, तसेच नृसिंह जयंती व बुद्ध पौर्णिमेच्या ही सर्वांना शुभेच्छा!

जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

**BMM Treasurer - Santosh Salvi**

**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**

**Ph: 603 438 9279**

**Email: santosh.salvi@bmmonline.org**


**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125

पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस

सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना

कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर

सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट

सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| एक आनंददायी मुलाखत: डॉ. सलील कुलकर्णी | ४ |
| जाहिरात | ९ |
| BMM पॉडकास्ट | १० |
| जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे तो आपुले | ११ |
| महाराष्ट्र दिन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ | १२ |
| समाजकारण ते राजकारण | १२ |
| NAFA चित्रपट महोत्सव २०२५ | १३ |
| मराठी वैभवचा १६ वा वाढदिवस | १५ |
| अर्थमंथन | १६ |
| मराठीच्या खजिन्यातली फारसी दौलत | १७ |
| कविता: राम नवमी | १९ |
| शांतता दोघातली | १९ |
| मातृत्व - एक वैश्विक भावना | २० |
| मराठी शाळा - निबंध स्पर्धा | २१ |
| कथा मराठी चित्रपटसृष्टीची | २३ |
| BMM Texas मैत्री मेळाव्याचा वृतांत | २४ |
| कविता: पुनःप्रारंभ | २६ |
| अमेरिकेत श्री स्वामी समर्थ जयंतीचा उत्सव | २६ |
| रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २६ |
| महाकुंभ | २८ |
| शुभं करोती कल्याणम | २९ |
| My Holi Party | ३० |
| जाहिरात | ३१ |
| MANA Paintings | ३२ |


## संपादक समिती


अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर


हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :

Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

# २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. वसंत ऋतू आता ऐन बहरात आला आहे आणि आम्ही सिॲटलकर स्वच्छ सूर्यप्रकाशाचा तसेच सर्वत्र फुललेल्या फुलांचा पुरेपुर आनंद लुटत आहोत. ह्या महिन्यात स्नेहसंमेलनाच्या तयारीच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे टप्पे पार पडले आणि त्या विषयीची माहिती तुम्हांला ह्या वृत्तात मिळेल.

सर्वप्रथम स्नेहसंमेलन टीमच्या 'ऑल हँड्स मीट' विषयी. मुख्य संयोजक श्री. मोहित चिटणीस ह्यांच्या अध्यक्षतेखाली आणि बीएमएम अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर ह्यांच्या उपस्थितीत बीएमएम स्नेहसंमेलन २०२६च्या संयोजन समिती सदस्यांची तसेच स्वयंसेवकांची 'ऑल हँड्स मीट' ५ एप्रिल २०२५ रोजी पार पडली. कार्यक्रमाला सुमारे दीडशे जण उपस्थित होते. मुख्य संयोजक, सहसंयोजक, कोषाध्यक्ष आणि मुख्य समितीतील सिॲटल महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधी म्हणजे २०२५ आणि २०२६च्या अध्यक्ष ह्यांनी संमेलनाच्या आत्तापर्यंतच्या तयारीचा अहवाल सादर केला आणि वेगवेगळ्या समित्यांनी केलेल्या परिश्रमाचं फलित सर्वांसमोर मांडून यशाचा आनंद द्विगुणित केला. श्री. प्रसाद पानवळकर ह्यांनी सर्व संयोजकांचे आभार मानले तसेच हाच उत्साह आणि जोश स्नेहसंमेलन पार पडेपर्यंत कायम ठेवण्याची विनंती केली. त्यानंतर मोहित आणि प्रसाद ह्यांनी निधी संकलन, कार्यक्रम, मार्केटींग, भोजन, आदरातिथ्य, वेब आणि तंत्रज्ञान तसेच बीएमएम उपक्रम अश्या वेगवेगळ्या समित्यांबरोबर बैठका घेऊन त्यांच्या कामाचा आढावा घेतला आणि पुढील काही महिन्यांच्या कामांसंबंधी सूचना तसेच सल्ला दिला. ह्याखेरीज इतरही अनेक भेटीगाठींमध्ये प्रसाद आणि मोहित ह्यांचे दोन दिवस व्यग्र गेले. स्नेहसंमेलनाच्या तयारीचे सगळे तपशिल तसेच आत्तापर्यंतची कामगिरी एकत्रित ऐकणं सगळ्यांसाठी आनंददायक आणि स्फूर्तीदायक होतं.

संयोजन समितीने स्नेहसंमेलनासाठी 'Tugoz' ही प्रणाली वापरण्याचे निश्चित केले असून त्यासंबंधीची सर्व औपचारिकता पूर्ण झाली आहे. विविध समित्यांनी आपापल्या गरजांप्रमाणे ही प्रणाली वापरायला आता सुरूवात केलेली आहे. Tugoz प्रणाली ह्यापूर्वीही बीएमएम स्नेहसंमेलनासाठी यशस्वीपणे वापरली गेली होती, तसेच बीएमएमशी संलग्न अनेक मंडळे हयाचा वापर करीत आहेत. Tugoz चे निर्माते मराठी भाषिक असून ते ही एका बीएमएम संलग्न मंडळाचे सदस्य आहेत. आधीच्या अनुभवांप्रमाणेच Tugoz प्रणाली ह्या स्नेहसंमेलनातही यशस्वीपणे वापरली जाईल ह्याची आम्हांला खात्री आहे.

नेहमीप्रमाणेच २०२६च्या स्नेहसंमेलनातही उत्तर अमेरिकेतल्या तसेच भारतातल्या कलाकारांचे दर्जेदार कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आम्ही ह्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्विकारण्यास सुरूवात केली आहे. आपण आपल्या कार्यक्रमांचे प्रस्ताव bmmseattle2026.org/programming-rfp ह्या लिंक वरून पाठवू शकता. उत्तर अमेरिकेतल्या कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत दिवाळी पाडवा म्हणजे २२ ऑक्टोबर २०२५ तर भारतातून आणि परदेशांतून येणाऱ्या कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी प्रस्ताव पाठवण्याची अंतिम मुदत गणेश चतुर्थी म्हणजे २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे. आपले प्रस्ताव पाठवण्यासंबंधी कुठलीही अडचण आल्यास किंवा काही शंका असल्यास programmingrfp@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर आमच्याशी नक्की संपर्क साधा. कार्यक्रमांखेरीज स्नेहसंमेलनात विविध स्पर्धाही आयोजित केल्या जाणार आहेत आणि त्यासंबंधीची माहिती आम्ही आपल्याला पुढील वृत्तपत्रांद्वारे देऊ.





स्नेहसंमेलनाची स्मरणिका समिती आपल्या सर्वांना स्मरणिकेसाठी लेख आणि कविता पाठवण्याचे आमंत्रण देते आहे. तुमच्या मनातील विचार कागदावर उतरवण्याची ही अमूल्य संधी चुकवू नका. मराठी भाषेत लिहिलेले लेख, प्रवास वर्णन, अनुभव लेखन, कथा, कविता, ललित लेख, जुन्या पारंपरिक पाककृती असे वैविध्यपूर्ण लिखाण स्मरणिकेसाठी आनंदाने स्वीकारले जाईल. लेखकाच्या वयाचे बंधन नाही त्यामुळे लहान मोठे सर्वांना आग्रहाचे आमंत्रण. मुलांनी देखील मराठीतून लिहिण्याचा प्रयत्न करावा अशी आमची आग्रहाची विनंती, पण मुलांचे इंग्लिश मधील लेख ही स्वीकारले जातील. लेख पाठवण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ आहे. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे आलेल्या कथांमधून सर्वोत्तम ३ कथांना पारितोषिक दिले जाईल. लेखन

आमच्यापर्यंत पोहोचवण्यासंबंधीच्या सुचना तसेच नियम आम्ही लवकरच जाहीर करू. स्मरणिकेसंबंधी काही प्रश्न किंवा शंका असल्यास smaranika@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर आमच्याशी नक्की संपर्क साधा.

आतापर्यंत पुढे आलेल्या सर्व देणगीदार आणि प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार. ह्या सर्वांच्या पाठिंब्याने आमच्या निधी संकलन समितीचे काम जोमाने सुरू आहे. देणगीदार आणि प्रायोजकांसाठीच्या पॅकेजबद्दलची सर्व माहिती स्नेहसंमेलनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
bmmseattle2026.org/individual-donor-sponsorship-tiers/ सर्व इच्छुक देणगीदारांना विनंती आहे की त्यांनी आमच्याशी donations@bmmseattle2026.org ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा. आमच्या निधी संकलन समितीचे सदस्य तुमच्याशी चर्चा करून तुम्हांला योग्य असे कॉर्पोरेट किंवा वैयक्तिक पॅकेज निवडायला मदत करतील.

आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता
फेसबूक: www.facebook.com/bmm2026seattle;
इंस्टाग्राम: www.instagram.com/bmm2026seattl_/.
तसेच आपल्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org ह्या इमेल पत्त्यावर संपर्क साधा.

- **पराग सहस्रबुद्धे**, मार्केटींग टीम




## बृहन्महाराष्ट्र मंडळ मैत्री मेळावा
## एक आनंददायी मुलाखत:
## डॉ. सलील कुलकर्णी

नमस्कार! येत्या दीड महिन्याने, जून १३-१४-१५ ला क्लिव्हलंड ओहायोला होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मैत्री मेळाव्यामधे 'इंद्रधनू' या प्रशांत दामले, संकर्षण कऱ्हाडे, सलील कुलकर्णी, निहिरा जोशी आणि शुभंकर कुलकर्णी यांच्या बरोबर कविता, सुगमसंगीत, किस्से, गप्पांचा रंगतदार कार्यक्रम होणार आहे.



त्यानिमित्त सुप्रसिद्ध संगीतकार, गायक आणि चित्रपट दिग्दर्शक डॉ. सलील कुलकर्णी यांची मुलाखत घेण्याचा योग आला. या मुलाखतीत सलील इतके सहजतेने बोलत होते की प्रश्नोत्तरांचं स्वरूप असलं तरी एखाद्या जाणकार यशस्वी व्यक्ती बरोबर जणु काही गप्पा मारत आहोत अस वाटलं. सलील यांनी सर्व प्रश्नांची उत्तरं तर दिलीच पण ते भरभरून आणि अतिशय मोकळेपणाने बोलले. त्यांच्या विचारांची स्पष्टता, बोलण्यातला सरळपणा, काव्य आणि संगीताविषयीची त्यांची उत्तम जाण आणि हा कविता, संगीताचा ठेवा पुढच्या पिढीतील तरूणांपर्यंत पोहोचविण्याची त्यांची तळमळ यांमुळे ही मुलाखत खूप आनंद देऊन गेली. मुलाखत घेताना मला मिळालेला आनंद आपल्या रसिक वाचकांपर्यंत पोचावा म्हणून सलील यांच्या बरोबर झालेली प्रश्नोत्तरे खाली देत आहे. वाचनाने मिळणारा हा आनंद प्रत्यक्ष अनुभवायला क्लिव्हलंडच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मैत्री मेळाव्याला रसिकांनी अवश्य यावे हे आग्रहाचे निमंत्रण.

**प्रश्न: सलील, मला असं वाटतं की तुम्ही आजच्या पिढीतल्या तरूणवर्गाशी उत्तम प्रकारे "connected" आहात आणि तुमचा तसा सतत प्रयत्न असतो. या मागचं कारण किंवा प्रेरणा काय आहे?**

**सलील:** मला असं निश्चितपणे वाटतं की तुम्ही आधीच्या पिढीचे अनुभव आणि संस्कार घ्यावे पण तुमची नजर पुढच्या पिढीवर असली पाहिजे. तुम्ही जर कायम मागे चालत राहिलात तर त्यात अडकून पडता. मी असं अनुभवलय की सुधीर मोघे, हृदयनाथ, लताताई, आणि

अन्य क्षेत्रातली मोठी माणसं माझी गाणी मनापासून ऐकायचे. मला वाटतं हे मी त्यांच्याकडून शिकलो. समोरचा माणूस किल्ला चढून वर येण्याची वाट न पाहता संवाद साधण्यासाठी तुम्ही पायऱ्या उतरून खाली गेलं पाहिजे. "पायऱ्या उतरून" म्हणताना यात काही अधिक-उणे म्हणायचं नाहीये, आपण अनुभवाच्या पायऱ्या अधिक चढलो आहोत इतकच. आमचा आताचा कार्यक्रम "धरोहर" हा यावरच आधारलेला आहे. फक्त वडील मुलांवर संस्कार करतात असं नाही. हा संवाद आहे. तो दोन्ही बाजूंनी आपण होऊ दिला पाहिजे. संवादाची परिभाषा बदलली असेल पण संवेदनशीलता, दाद देणं, किंवा प्रतिभा ही पूर्वी होती तशीच आजही आहे. ती काही एका पिढीची जहागीर नाही. मी जेव्हा गाणं शिकवतो तेव्हा मुलांना समजावून सांगतो. उदाहरणार्थ सध्या मी ५-६ वर्षांच्या मुलांना "निश्चयाचा महामेरू" हे, रोज एक ओळ अर्थासकट समजावून शिकवतो. आजच्या तरूण पिढीला त्यांच्या परिभाषेत सांगतो. त्यामुळे बा. भ. बोरकरांच्या कवितांच्या कार्यक्रमात साधारणत: ५०% तरूण प्रेक्षक श्रोते असतात. पुढच्या पिढीला आपण सांगू, दाखवू तेच जग आहे. हे तुम्हाला समजणार नाही असं म्हणण्यापेक्षा, ते कठीण करून सांगण्यापेक्षा, सोपं करून त्यांच्या भाषेत सांगायला हवं. ते मी करतो आणि मला त्याचा अभिमान आहे. माझे मित्र म्हणतात तसं कुठल्याही राष्ट्रीय अथवा अन्य पुरस्कारांपेक्षा हे साध्य केल्याचं मला अधिक समाधान आहे. हे काम सगळ्या पिढ्यांसाठी असावं. ते जर एकाच ठराविक पिढीत अडकलं तर काहीतरी गडबड आहे.

**प्रश्न: खरंच तुम्ही पुढच्या पिढीला हे पोहचवण्याचं फार महत्त्वाचं काम करत आहात. याला जोडून पुढचा प्रश्न असा की तुम्ही गाण्यासाठी जशा निवडक कविता, उत्तम अभिजात काव्य म्हणू आपण, निवडून त्यांची गाणी करता. ही अतिशय महत्त्वाची कौतुकास्पद गोष्ट आहे. तर तुमची या मागची काय प्रेरणा आहे?**

**सलील:** तुम्ही जे म्हणालात, "प्रेरणा" हे अगदी योग्य आहे. ही प्रेरणाच आहे. हे काही फायद्यासाठी नाही किंवा Business Plan, Career graph नाहीये. इथे मला मजा येते. खरं सांगू का, मी वारंवार स्वत:ला हे विचारतो की "Why am I here?". मी मेडिसिनचं चांगलं शिक्षण घेऊन उत्तम गुणांनी उतीर्ण होऊन MD करणारा मुलगा, संगीतक्षेत्रात काम करायचा निर्णय घेतो, त्याचा मला आदर केला पाहिजे. म्हणजे एकाही गाण्याखाली सही करताना आपल्याला लाज नाही वाटता कामा. तुमच्यासारखे, ज्यांनी उत्तम साहित्य वाचलेलं आहे त्या सर्वांचा, माझी आई, मुलगा मुलगी, ज्या कवींच्या कवितांची गाणी मी करतो, त्या सर्वांचाच मला आदर राखला पाहिजे. सुधीर मोघे, हृदयनाथ, ग्रेस, लताताईसारख्यांनी माझ्या गाण्यांसाठी माझं कौतुक केलं त्या सगळ्यांनाच I feel answerable to all of them. त्यांचा मला धाक आहे, आणि तो असायला हवा. माझी मुलगी आता मोठी आहे, क्रिकेटिअर आहे. माझं एखादं गाणं ऐकल्यावर जर तिनी मला विचारलं की काय हे, बाबा हे तुमचं गाणं आहे? तर मला रात्री झोप नाही लागणार. त्यामुळे मी कवितांच्या निवडीच्या बाबतीत खूपच, म्हणजे अति करतो असं काही म्हणतील, अतिशय चोखंदळ आहे. मी या सर्वांनाच आणि मुख्य म्हणजे माझ्या श्रोत्यांना, जे माझी ग्रेसच्या सखोल कवितांची गाणीही ऐकायला आवर्जून येतात त्या सर्वांना answerable आहे. त्यामुळे मी कविता निवडताना चुकुनही एक पायरीही खाली येत नाही.

**प्रश्न: अशा उत्तम कविता पुढे यायला पाहिजेत. या कवितांची तुम्ही संगीत देऊन गाणी करता, त्यांचे कार्यक्रम करून त्या सर्वांसमोर आणता, समजावून सांगता यासाठी तुम्हाला धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. तुम्ही भारतात तर कार्यक्रम करताच, तसेच विदेशातही करता. अमेरिका, युरोप आणि अन्य देशांमधेही तुमचे अनेक कार्यक्रम झाले आहेत. तर तुम्हाला या कार्यक्रमांमधून भारतातले प्रेक्षक-श्रोते आणि अमेरिकेतले/युरोपातले प्रेक्षक-श्रोते यांमधे काही फरक जाणवला का? आणि त्याला जोडूनच, या कार्यक्रमामधे, आधी किंवा कार्यक्रमानंतर, इथल्या श्रोत्यांचा काही विशेष असा अनुभव जो तुमच्या मनाला भिडला असा एखादा अनुभव सांगाल का?**

**सलील:** चांगले श्रोते कुठेही असतात. सगळीकडे, म्हणजे तुम्ही बार्शी, परभणीला जा किंवा लॉस एंजलिस, क्लिव्हलंडला जा, सगळीकडे चांगली संवेदनशील EQ, IQ असलीली लोकं असतात. तसंच सगळीकडेच अत्यंत दगड लोकही असतात. एक मात्र आहे की अमेरिकेला यूकेला गेलेल्या, विशेषत: इंटरनेटपूर्वी गेलेल्या लोकांमधे मला जाणवलं की त्यांनी पुष्कळ चांगलं वाचलं ऐकलं आहे. तिथल्या लोकांना फार सिस्टिमॅटिक वेळ मिळतो. चांगलं वाचायला, ऐकायला. भारतात लोक उपलब्ध असतात पण त्या मानाने वाचलं ऐकलं जात नाही. अमेरिका, यूकेच्या लोकांना असं वाटतं की वाचणं ऐकणं आमच्या हातून सुटू नये. ही जी भूक आहे, इच्छा आहे, की हे आपल्या हातून सुटता कामा नये हे तिथल्या लोकांमधे मला जास्त जाणवतं. अर्थात याचं कारण म्हणजे तिथे गेलेले लोक हे well read, well heard असे एका काळापर्यंत तरी होते. आता कदाचित फरक पडला असेल.

आठवणी तर खूपच आहेत. अगदी खरं सांगायचं तर ही दाद तर मला पुष्कळ लोकांनी दिली की, "आम्हाला माहितच नव्हतं की इतकं चांगलं काम आताच्या पिढीतपण करतायत. खूप लोकांनी

मला दाद दिली की बोरकर, विंदा, कुसुमाग्रज हे कवी, सुधीर फडके, हृदयनाथ, अभिषेकीबुवा यांच्या बरोबरच आता हे कवीपण बाजूला पडतील. पण तसं नाही झालं. मी आणि हृदयनाथांनी एकत्र कार्यक्रम केले तेव्हा लोकांनी मला, "आम्ही त्यांच्यासाठी आलो पण आता आम्ही तुमचेपण फॅन झालो" अशी complements दिली. मैलोन् मैल, तीन-साडेतीन तास ड्राईव्ह करून आलेले लोकही असतात की आम्हाला तुमचं हे लाईव्ह ऐकायच आहे. मला आठवतय की एक मुलगी होती. "आयुष्यावर बोलू काही"चा कार्यक्रम होता. सगळा कार्यक्रम संपल्यावर ती मला म्हणाली की मला बोरकरांचं "आयुष्याची झाली आतां उजवण, येतो तो क्षण अमृताचा ऐकायच होतं, पण ठीक आहे पुन्हा केव्हातरी". मी तिला विचारलं की तू कुठे राहतेस? म्हणजे आसपास राहत असलीस तर उद्यासुद्धा कार्यक्रम आहे. तेव्हा ती म्हणाली की नाही, मी साडेतीन तास ड्राईव्ह करून आल्ये. मग मी तिला सांगीतल की बस. मी तबलजीला डग्गा काढायला लावला, पुन्हा पेटी उघडली आणि जसं कार्यक्रमात करतो तस ते गाणं तिला ऐकवलं. आणि मी विचारूनही तिने ते रेकॉर्ड केलं नाही. ती म्हणाली की मला फक्त प्रत्यक्ष ऐकायच आहे. खरं सांगायच तर एकदा का सभागृहाची दारं बंद झाली की मग कोथरूड काय, शिवाजीमंदिर काय गडकरी काय किंवा लॉस एंजलिस, न्यू जर्सी काय, सगळीकडे चांगले प्रेक्षक मला लाभले. मी First generation musician आहे, पण माझी गाणी सगळीकडे प्रचलित झाली आहेत. एकदा तिकडे एका घरगुती कार्यक्रमात मी गाण्याची पहिली ओळ म्हटली की सगळे ते संपूर्ण गाणं माझ्या बरोबर म्हणत होते. असाही अनुभव आहे.

**प्रश्न: तुम्ही गाण्यांना संगीत देता,ज्याला आम्ही सामान्य माणसं गाण्याला चाल लावणं म्हणतो, तर हे संगीतबद्ध करण्याची काही प्रक्रिया असते का, किंवा तुम्ही वापरता का? आधी स्वर/सूर सुचतात की आधी ताल येतो? वाद्यवृंदाची साथ असेल तर कोणतं वाद्य कधी कसं वाजेल याचा मेळ तुम्हाला कसा सुचतो? या गाण्यांना संगीत देताना तुम्ही प्रसंग किंवा गाण्यातला भाव लक्षात घेऊन विशिष्ट राग निवडून त्यानुसार संगीत देता का?**

**सलील:** मी पहिलं गाणं १९९६ मधे केलं, आता पुढच्या वर्षी ३० वर्षं होतील. अजून तरी मी एकही गाणं हार्मोनिअम घेऊन किंवा तानपुरा लावून कंपोझ केलेलं नाही. हे मैत्रीसारखं आहे. भेट कधी कुठे झाली, मैत्री कशी झाली हे महत्त्वाच नाही. मैत्री टिकली कशी हे महत्वाचं आहे. चाल आधी ठरली आणि मग त्यावर गाणं लिहिलं असं माझ्या गाण्यांचही झालं आहे. माझ्या चालीवर शांताबाईनी, सुधीर मोघ्यांनी, संदीप खरेनी, किशोर कदमांनी गाणी लिहिली आहेत आणि तीही खूप प्रसिद्धही झाल्येत. बोरकरांनी तशी गाणी लिहिण्याचा प्रश्नच नव्हता कारण ते पूर्वीच गेले. त्यांच्या कवितांची गाणी मी कशी केली ह्याची प्रक्रिया मी सांगू शकतो. देवाच्या कृपेने मी तीन चारदा कविता वाचली की ती मला पाठ होते. कविता मी अनेक दिवस वाचतो. नुसतीच वाचतो, चाल लावायची म्हणून वाचत नाही. सगळ्या कवितांच गाणं करण्याची गरजही नाही. त्याने ती कविता पातळ होण्याची, तिची धार कमी होण्याचा संभव असतो. आता काय होतं की कविता अशी काही दिवस वाचल्यावर मला असं वाटतं की मी या कवितेला वाचनानी होणाऱ्या परिणामापेक्षा अधिक काही देऊ शकतो. तेव्हाही बघा, तुम्हाला एखाद्या वाड्यामधे नेहेमी महाद्वारातूनच प्रवेश मिळेल असं नसतं, तसं काही वेळा एकदम अंतऱ्याची चाल प्रथम सुचते. त्यामुळे ह्याची एकच प्रक्रिया नाही, निरनिराळ्या असू शकतात. काही गाण्यांसाठी क्षणार्धात चाल सुचते तर काही गाण्यांना मी दोनदोन तीनतीन महिनेही घेतलेत, की चाल सुचत नाहीये.

मला कवितेच्या दारातूनच आत जायला आवडतं. ती कविता काय म्हणत्ये त्याप्रमाणे चाल असायला हवी. तसच कवितेच्या शब्दांच्या पोतानुसार चाल सुचायला हवी. मग ते बालगीत असो, कविता असो की चित्रपट गीत असो. तुम्ही "अभिजात" शब्द वापरलात. कवितेत अभिजातता किती आहे यावर अवलंबून आहे. आता बा. भ. बोरकरांची "तू गेल्यावर फिके चांदणे, घर परसूही सुने सुके" ही कविता मी पुन्हापुन्हा वाचली आणि एका कार्यक्रमात त्याचं गाणं म्हटल तेव्हा हृदयनाथ म्हणाले कितीतरी दिवसांनी दरबारी इतका सुंदर गायला कुणीतरी. तेव्हा मी म्हटलं बापरे हा दरबारी आहे! चांगलं आहे. असेल तर well and good, कारण मी दरबारीतलं म्हणून नाही केलं, मी चाल म्हणून केलं. आता मला राग माहिती आहेत का? तर पुष्कळ माहिती आहेत. मी लहानपणी दहावीत असल्यापासून मोठ्या मोठ्या गायकांना हार्मोनिअमची साथ दिलेली आहे. पण मला सुचलेली चाल करायला आवडते. रचलेली चाल करायला नाही आवडत. माझी अनेक रागबद्ध गाणी आहेत, पण ती पूर्ण होईपर्यंत आम्ही त्याची कधी चर्चाही केली नाही. ऐकल्यावर दुसऱ्यानी ते म्हणणं किंवा नंतर माझ्या लक्षात येणं चांगल. राग नेहेमी आपल्या पाठीशी उभे असतात, पण त्यांचा सारखा टेकू घेऊन चाली करू नयेत.

**प्रश्न: आता एक मला विचारायला अवघड असा प्रश्न विचारतो. अलिकडे, काही वर्षं झाली, जे फ्यूजन संगीत झालय, त्याबद्दल तुमच काय मत आहे?**

**सलील:** हा फ्यूजन शब्द एक weird, vague शब्द आहे. अशी गाणी वाढण्याचं कारण तुम्हाला सांगतो. जेव्हा टेक्निशियन डॉक्टर होतो, प्रोग्रमर कंपोझर होतो तेव्हा असं होतं. हे प्रोग्रामर काय करतात, तर अनेक रेडीमेड म्युझिक लूपस् आहेत. ती एक एक लावून गाणं

बसतय का बघतात. त्यामुळे अशी विचित्र गाणी होतात. कार्यक्रमात जे फ्यूजन करतात ते मला मुळीच आवडत नाही. मूळ गाण्याच्या संगीतकारानी रात्ररात्र जागून ते सूर तो ठेका ठरवलेला असतो. ते तुम्हाला सोपं जावं म्हणून तुम्ही बदलता. बरं, सदोदित सेन्शुअलच टोन कसा काय असू शकतो? म्हणजे प्रेमगीत असो, भक्तिगीत असो, बालगीत असो किंवा देशभक्तीपर गीत असो. कायमच कसा काय सेन्शुअल टोन वापरता? याचं कारण त्यासाठी पक्का सूर लागत नाही. वर आणखी असं म्हणतात की जुनी गाणी आम्ही नवीन, आमच्या स्वरूपात करतो. पण ते चूक आहे. हे मला मंजूरच नाही. तो अधिकार तुम्हाला कोणी दिला? ज्यांनी ४० वर्षांपूर्वी राणीचं सुंदर चित्र काढलय त्याचा तुम्ही राजा नका करू! तुम्ही तुमचा राजा जरूर काढा. असलेल्या गोष्टीत गोंधळ करणं हे मला एक संगीतनिर्माता म्हणून अतिशय अपमानास्पद वाटतं. म्हणून असलेली गाणी वेडीवाकडी केलेली मला आवडत नाही.

**प्रश्न: शिवकुमार शर्मा, जसराजजी, भीमसेनजी यांना देव्हाऱ्यासमोर बसून वादन करताना, ईश्वर नमनाने कार्यक्रमाची सुरुवात करताना, देवीचं स्तुतीपर गाणं आवर्जून गाताना आपण पाहिलं आहे. तुमचीही काही श्रद्धास्थानं आहेत का? तुम्हाला चालणार असेल तर सांगता का?**

**सलील:** हो. मी अगदी पूर्णपणे श्रद्धाळू आहे. याच कारणही सांगतो. बघा, अनेक चित्रपटांना, सातशेच्यावर गाण्यांना मी संगीत दिलय. अशा गोष्टी सुचतातच कशा? मग हे आपलं नाही हे जाणवत. लहानपणापासून "भाव सरगम" कार्यक्रमाला शेवटच्या रांगेत बसून वन्स मोअर देणारा मी होतो. २०११मधे हृदयनाथ आपण एकत्र कार्यक्रम करूया असं स्वत:हून सुचवतात. असं कसं होईल? असं व्हायला तुमची श्रद्धा कारण असते. There is some factor ज्याची blessings तुम्हाला मिळत असतात, म्हणून तुमच्या हातून चांगलं काम झालं. असं मानायला मला खूप कारणं आहेत. मी अनेक चित्रपटांना संगीत दिलय पण मला राष्ट्रीय पुरस्कार मिळला तो चित्रपट दिग्दर्शक म्हणून. कलाकारांना देव मानावाच लागतो. काही वेळा तुमचा गळा, साऊंड सिस्टीम, प्रकाश योजना, थिएटर, सगळकाही उत्तम असतं पण कार्यक्रम रंगत नाही. तर काही वेळा तुमचा आवाज ठीक नाही, साऊंड सिस्टीम नीट नाही, भयंकर उकडतय, थिएटरच्या पंख्याचा आवाज त्रास देतोय, असं असतानाही कार्यक्रम चांगला रंगतो. सगळं विपरित असूनही कार्यक्रम रंगतो. असं कसं होतं? There is a factor beyond you and audience, जो ठरवतो की हा कार्यक्रम रंगवायचा. आणि हे मला सगळं सुचतं कुठून? मी लहानपणापासून देव मानतो. कुठल्याही कार्यक्रमाला बाहेर पडताना मी आईला नमस्कार करून निघतो. त्याने मला फरक पडतो. कधी नेमकी तेव्हा आई घरी नसेल तर मला अस्वस्थ वाटतं. मला मनापासून देवळात जाणारी, नुसतं परीक्षेपुरता नमस्कार करणारी नाही, माणसं आवडतात. या श्रद्धा मी मानतो.

**प्रश्न: तुम्ही शुभंकरला गाणं शिकवता, त्याच वेळी तुमचा तो मुलगा आहे. ह्या, गुरु-शिष्य आणि वडील-मुलगा हया नात्यांना तुम्ही कसं सांभाळता?**

**सलील:** मला तर वाटतं की हे नेहेमीच सांभाळलं पाहिजे. मी जेव्हा रिऍलिटी शोमधे परिक्षक असतो ना, तेव्हा मी कुठल्याही वयोगटातल्या माणसाच्या बाबतीत हा विचार करतो, जसं की हा आपला मुलगाच आहे. याला किती आणि कसं बोललेल आपल्याला एक वडील म्हणून चालेल? मी जर श्रोत्यांमधे त्याचे वडील म्हणून बसलेलो असेन तर परीक्षक काय बोललेले मला नाही आवडणार? तेवढच बोललं पाहिजे. सगळ्यांनीच दुसऱ्यामधे आपला मुलगा, मित्र, मैत्रीण पाहून बोललं पाहिजे. शिकवताना मी लहान मुलांपासून अगदी लताताईंना चाल सांगताना अतिशय तपशीलवार सांगतो. नुसतं हे गाणं गा, असं नाही. हे गाणं तुम्हाला का गायचय, तुम्हाला काय convey करायचय? आणि शुभंकर बरोबर मी unidirectional नातं ठेवलेलं नाहीये. "एक गाणे द्यायचे अन् एक गाणे घ्यायचे" असं ते आहे. मला नेहेमीच वाटतं मुलांशी संवाद हा फक्त पालक बोलतायत असा नसावा, तो दोन्ही बाजूंनी हवा. त्यामुळे दोन्ही बाजूंनी एकमेकांची enrichment होणं हे मी माझं भाग्य समजतो. आणि गंमत म्हणजे मुलगी काय किंवा शुभंकर काय, मी जरा ओरडण्याचा आवाज काढला तर हसायलाच लागतात. कारण त्यांना माहिती आहे की याच्याकडे तो टोनच उपलब्ध नाहीये!

**प्रश्न: व्यक्ती म्हणून आणि विशेषत: संगीतकार म्हणून तुमच्यावर कुणाचा प्रभाव आहे असं तुम्हाला वाटतं?**

**सलील:** अनेकांचा आहे, आणि सगळ्यांचा असतोच. कोणीच त्यातून सुटत नाही. पण फक्त नक्कल करू नये. प्रभाव असणं आणि नक्कल करणं याच्यामधे खूप फरक आहे. प्रभाव आपल्या आई-वडिलांचा असतो. सगळ्याच मोठ्या नातेवाईकांचा असतो. बरोबरीच्या मित्रांचा असतो. माझ्यावर "विचार करणे" या बाबतीत प्रभाव सुधीर मोघे आणि हृदयनाथ या दोघांचा आहे. निर्णय घेण्यात म्हणजे एखादं प्रोजेक्ट करावं की नाही, घ्यावं की नाही असे निर्णय घेण्यावर या दोघांचा खूप प्रभाव आहे. कविता निवडीवर हृदयनाथजींचा खूप प्रभाव आहे. म्हणजे त्यांनी ज्या प्रकारचं साहित्य आणलं तसं आपण आणायला पाहिजे. गायक म्हणून सुरेशजींचा प्रभाव आहे. कधी

अभिषेकीबुवांची एखादी जागा सहज येऊन जाते. तुम्ही इतके भिजलेले असता ना, की नंतर कोणता ढग ते नाही सांगता येत.

**प्रश्न: नवोदित, किंवा त्याहीपेक्षा आपण हौशी म्हणूया, जे कलाकार, गायक, आहेत, कुणी संगीतकारही असतील, त्यांना मग ते भारतातले असोत किंवा आमच्या दृष्टीने विशेषत: इथले, जे आवड ठेऊन करतायत, त्यांना तुम्ही तुमच्या इतक्या प्रवासानंतर काय सल्ला द्याल?**

**सलील:** डायरीत किती गाणी आहेत याच्यापेक्षा कुठलं गाणं तुम्हाला १००%च्या जवळ गाता येतय याला महत्त्व दिलत तर you will enjoy the journey better. मला असं वाटतं की एकच गाणं गावं, "मोगरा फुलला" गावं किंवा अगदी सरळ "ही वाट दूर जाते" गावं, किंवा हिंदीतलं सोपं "आ चल के तुझे" गावं, पण ते convey झालं पाहिजे. तुम्ही किती गाणी गाता यापेक्षा मुद्दा असा आहे की ते गाणं तुम्हाला येतं का? प्रयत्न असा पाहिजे की गाण्याची भावना पोचली पाहिजे, त्याची लयकारी जमली पाहिजे, शब्दोच्चारपण यायला पाहिजेत. तेव्हा माझं असं म्हणणं आहे की जरूर शिका, कुणाकडेतरी गाणं शिका आणि नुसती गाणी, गाणी करण्यापेक्षा गाण्याचं तत्त्व शिकण्याचा प्रयत्न करा. म्हणजे एखादं गाणं गायचं म्हणजे काय गायचं, मैफिल रंगवायची म्हणजे काय करायचं, मायक्रोफोन कसा वापरावा, हे सगळं शिका. पण एक उपचार म्हणून नुसती डायरी भरणं, त्याच्यापेक्षा तुम्ही स्वत:साठी गातानापण तुम्हाला असं वाटलं पाहिजे की क्या बात हैं, छान गेली ही जागा!

**प्रश्न: तुम्ही इतके कार्यक्रम करता तेव्हा तुमच्या प्रेक्षक-श्रोत्यांकडून विशेषत: क्लिव्हलंडच्या प्रेक्षक-श्रोत्यांकडून काय अपेक्षा आहेत?**

**सलील:** मला असं वाटतं की प्रेक्षक-श्रोत्यांनी चांगल्या अर्थानी कलाकारांवर दबाव ठेवला पाहिजे. की आम्ही आमचा वेळ देतोय, तर तुम्ही, you should give your best असं. मला वाटतं की चांगल्या अर्थानी अपेक्षा वाढवायला पाहिजेत की, नाही तुम्ही इतकी वर्षं गाताय तर आम्हाला तुमचं जुनं पण ऐकवा आणि नवीन पण ऐकवा. रसिक म्हणून तुमची भूक भरपूर पाहिजे आणि त्याच बरोबर संवेदनशीलतापण पाहिजे. म्हणजे आपण कशानंतर कसली फर्माईश देतोय? आपण काय प्रकारे दाद देतोय? हे दोन्ही पाहिजे. म्हणजे प्रेक्षकांचा कलाकारांवर धाक पाहिजे आणि प्रेक्षकांनी आपलं स्वत:चं ऐकण्याच वर्तुळही थोडं मोठ केलं पाहिजे. तेव्हा तो संवाद एकमेकांना अधिक समृद्ध करणारा संवाद होतो. सरधोपट मार्गानी कलाकारांनी जाऊ नये आणि रसिकांनीही सरधोपट रसिक होऊ नये. रसिकांनी एक पाऊल पुढे यावं, तर कलाकार दोन पावलं पुढे येतील.

**प्रश्न: तुम्ही कार्यक्रमांमधे खूप व्यस्त असता, गडबडीत असता. तुमचा प्रवासही खूप असतो. तर हे सगळं करताना तुमचं विरंगुळ्याचं स्थान काय? कशामधे तुम्हाला विरंगुळा मिळतो? तुमचा तसा ठरवून अथवा न ठरवता प्रयत्न असतो?**

**सलील:** मुलं. माझी दोन्ही मुलं आणि शाळकरी मित्र. म्हणजे जिथे तुम्हाला सगळे दागिने उतरवून गप्पा मारता येतात. तिथे मी जास्त शांत असतो. म्हणजे माझं असं म्हणणं आहे की शेवटच गाणं संपवून पेटीचा भाता लावला ना की तुम्ही फक्त कुणाचे तरी बाबा आणि कुणाचा तरी मुलगा आणि मित्र होऊन बाहेर पडायला पाहिजे. इतक मी पाळतो पण आणि त्याचा खूप फायदाही होतो. स्टेजवर असे पर्यंत तुम्ही काय ती हुषारी करावी. नंतर तो माझा विरंगुळा आहे. एखादा दिवस, म्हणजे उदाहरणार्थ कालच, आम्ही लोणावळ्याला सगळे जाऊन आलो. तिथे पण आम्ही गिटार घेऊन गायलोबियलो. ते सगळं ठीक आहे. पण हा त्यांच्या बरोबरचा वेळ; तो माझा विरंगुळा आहे.

सलील, तुम्हाला अतिशय मनापासून धन्यवाद! इतके गडबडीत असूनही तुम्ही इतका वेळ दिलात, अगदी मोकळेपणानी सर्व प्रश्नांना उत्तरं दिलीत यासाठी आभार! जूनमधे होणाऱ्या कार्यक्रमामधे भेटूच.

- **श्रीकांत लिमये,** क्लिव्हलंड, ओहायो

ईशान्य ओहायो मराठी मंडळ



सुवर्णमहोत्सव
BMM मेळावा २०२५

# 3 days of Marathi Extravaganza

# BMM2025 & NEOMM

Co-hosts: Pittsburgh, Columbus, Cincinnati, Buffalo, Detroit

## Golden Jubilee Celebration!

## June 13, 14 & 15

Only $250

Drama, Classical, Rock, Poetry, Food, Friends & Fun!








## Severance Hall, Cleveland, Ohio

**50 years ago, in 1975, a handful of Marathi families living in the area at that time came together and founded Northeast Ohio Marathi Mandal (NEOMM) - a non-profit 501c(3) - to celebrate the rich and ancient Marathi culture in the Northeast Ohio region. NEOMM is a proud member of Bruhan Maharashtra Mandal (BMM) - the national body of all Marathi organizations in the USA and Canada. BMM has awarded the rights to host its prestigious 2025 Maitree-Melawa event (regional convention) to NEOMM!**

**It's my great pleasure to invite you to this auspicious occasion! - Tanmayee Dixit, Covener**

**Hightlights**

Star-studdeed lineup straight from Maharashtra!

Shaan - first time ever with Marathi-Hindi songs, Prashant Damle, Mahesh Kale, Sankarshan Karhade, Nihira Joshi, Salil Kulkarni, Shaunak Abhisheki, Shubhankar Kulkarni and more!

Yayati and Devayani by popular demand!

The Best of North America Talent show!

Friends and family sit together

1 adult (18+) ticket includes 1 free child ticket

Priority access to nearest hotels | Negotiated hotel rates

3 meals, 2 breakfasts, tea/coffee snack stations

Prestigious banquet dinner with artists, sponsors and donors (available for purchase)

**Contact: Prasad Panwalker, BMM President (512) 294-3229, Dr. Medha Godbole, BMM EC (440) 241-3167 or your Local Mandal President**

## BMM पॉडकास्ट

BMM पॉडकास्ट हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा एक नाविन्यपूर्ण आणि लोकप्रिय उपक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत, बालगोपाळांसाठी कथा BMM आणि मोठ्यांसाठी साहित्यमित्र अशा २ मालिका आपण ऐकत आहोत. नुकताच कथा BMM या मालिकेचा १००वा भाग आपण ऐकला. त्यानिमित्ताने या उपक्रमाचे संचालक आणि BMM कार्यकारिणीचे सदस्य श्री. राहुल देशमुख यांच्याशी केलेली ही बातचीत:

**प्र.: राहुल सर, BMM चे एखादे पॉडकास्ट सुरु करावे, ही कल्पना कशी सुचली?**

**राहुल:** दर वर्षी मराठी शाळेतर्फे शिवचरित्राचे पारायण zoom च्या माध्यमातून होते. २० दिवसात जवळपास ४० वाचक यात सहभागी होतात, असंख्य श्रोते या पारायणाची वाट पाहत असतात. असं लक्षात आलं की श्रोते भारावून जाऊन कार्यक्रम संपल्यावर थांबून चर्चा करत आहेत. या कार्यक्रमाच्या ध्वनिमुद्रित भागासही उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे चांगल्या साहित्यकृतींचं पॉडकास्ट करावं असं ठरलं. त्यावेळचे BMMचे अध्यक्ष श्री. संदीप दीक्षित आणि कार्यकारिणीच्या सदस्या सौ. सविता मोरे यांच्या पाठिंब्याने WhatsAppचा एक गट बनवला गेला आणि BMM च्या सभासदांना त्यात भाग घेण्यासाठी पाचारण करण्यात आले. आयोजक आणि अभिवाचक यांचा एक चमू तयार झाला आणि BMM पॉडकास्टची सुरुवात झाली.




**प्र.: लहान मुलांसाठीच्या कथा या BMM पॉडकास्ट मागची प्रेरणा काय होती?**

**राहुल:** अमेरिकेतील मराठी मुलांसाठी आंतरजालावर YouTubeच्या माध्यमातून मराठी कथा आणि बालसाहित्य व्हिडिओच्या रूपात उपलब्ध आहे खरे पण संस्कारक्षम कथांचा थोडा अभावच आहे. तसेच, व्हिडिओ पाहिल्यामुळे मुलांच्या स्वत:च्या कल्पनाशक्तीला वाव मिळत नाही. हल्ली रात्री झोपण्यापूर्वी आई-बाबा किंवा आजी-आजोबांकडून गोष्ट ऐकण्याची पद्धतही जवळजवळ नाहीशी झाली आहे. या सगळ्यावर तोडगा म्हणून लहान मुलांच्या कथांचा ५ मिनिटांचा पॉडकास्ट सुरू करावा असं ठरलं आणि साने गुरुजींच्या ‘श्यामची आई’ या पुस्तकांपासून सुरुवात झाली.

**प्र.: त्यापुढचा प्रवास कसा होता?**

**राहुल:** पहिल्या पॉडकास्ट मालिकेला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे उत्साह वाढला आणि इतर कोणती पुस्तके यात सामील करून घ्यावीत असा विचार होऊ लागला. त्यात आमच्या असे लक्षात आले की पुस्तकांच्या बाबतीत कॉपी-राईट्सचा मोठा प्रश्न आहे तसेच जुन्या पुस्तकांमधील जागा आणि संदर्भ इथल्या मुलांशी संबंधित नाहीत. मग किशोर मासिकाची कल्पना समोर आली आणि महाराष्ट्र शासनाची अनुमतीही या पॉडकास्टसाठी मिळाली. किशोर मासिकांत गेल्या २५ वर्षांतील उत्तम साहित्य आहे- अगदी आईवडिलांच्या काळापासून ते आताच्या आंतरजालाच्या जमान्यापर्यंत. गेल्या १०३ भागांत आपण सणवार, संत, बालभारती पुस्तकांतील संस्कारपूर्ण धडे, किशोर मासिकातील साहित्य, साने गुरुजींचे साहित्य, शिवचरित्र अशा विविध विषयांवर आधारित कथांचे पॉडकास्ट केले आहे.

**प्र.: साहित्यमित्र या पॉडकास्टचा प्रवास कसा झाला? आत्तापर्यंत कोणते साहित्य वाचले गेले आहे?**

**राहुल:** साहित्यमित्राची सुरुवात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याने झाली. त्यानंतर उत्तर अमेरिकेतून अनेक वर्षे प्रकाशित होणाऱ्या एकता या त्रै-मासिकातील विजेत्या कथा ज्या ‘विदेशींनी’ या संग्रहात प्रकाशित झाल्या आहेत, त्यांची मालिका केली. सध्या एक नाविन्यपूर्ण पॉडकास्ट सुरु आहे, ‘गावाकडची अमेरिका’. यात अमेरिकेतील ग्रामीण भागावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. पुढच्या दोन पुस्तकांवर काम चालू आहे.

**प्र.: या कामासाठी अनेक स्वयंसेवकांची गरज पडत असेल? तसंच सगळ्या कामाची आखणी काटेकोर पद्धतीने करावी लागत असेल?**

**राहुल:** हो. कथा BMM आणि साहित्यमित्रमध्ये आठवड्याला ३ भागांचे पॉडकास्ट होते. स्वयंसेवक आळीपाळीने काम करतात. हे दीर्घ काळ चालणारे काम असल्याने आम्हाला नवीन स्वयंसेवक हवेच असतात. प्रथम नवीन पुस्तकाची निवड केली जाते, त्यावर पुनर्विचार आणि चर्चा केली जाते आणि मग अभिवाचनाचे वेळापत्रक आणि अभिवाचक ठरवले जातात. कथा BMM साठी अभिवाचन म्हणून प्रथम BMM च्या शाळांतील शिक्षकांना प्राधान्य दिले जाते.

**प्र.: ह्या पॉडकास्टना श्रोत्यांचा प्रतिसाद कसा आहे?**

**राहुल:** उत्तम! गेल्या दोन वर्षांत आपल्याला ४०१ अभिवाचक लाभले आहेत. १४ देशांतल्या ४०००० हुन अधिक श्रोत्यांनी हे पॉडकास्ट ऐकले आहेत. हे पॉडकास्ट Spotify ह्या माध्यमातून उपलब्ध आहेत. त्याचा दुवा:

**Spotify Link : कथा BMM :**
https://open.spotify.com/show/0Fpbvn3fBqOAVNuuabFxKA

**Spotify Link : साहित्य मित्र:**
https://open.spotify.com/show/5b8VhURslMFHgecfIRWw8H

**प्र.: आमचे वाचक या उपक्रमात कसे सामील होऊ शकतात ?**

**राहुल:** श्रोत्यांच्या WhatsApp गटात सामील होण्यासाठी:
https://chat.whatsapp.com/DRPgCRORlO0GA9H5rJyl4x

**अभिवाचकांसाठी:** २ महिन्यातून एक उपक्रम चालवला जातो त्यासाठी वेळापत्रक आखले जाते आणि प्रत्येक कामाचे काटेकोर नियोजन केले जाते. तसेच, प्रत्येक टप्प्याच्या पूर्णत्वासाठीची तारीख कसोशीने पाळली जाते.

संपर्क: rahul.deshmukh@bmmonline.org

**मुलाखतकार:** खरंच, हा एक उद्बोधक आणि उपयुक्त उपक्रम आहे. याबद्दल अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीसाठी अनेकोत्तम शुभेच्छा!

**BMM पॉडकास्ट चमू**




- **बृ. म. मं. वृत्त समिती**

**राशिभविष्य : मे २०२५**

**“शनि राहू युती त्रासदायक असणार पण १४ मे ला गुरु आणि २९ मे ला राहू केतु राश्यांतर होउन सर्वांची सुटका होणार."**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे तो आपुले

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे तो आपुले
तोची साधु ओळखावा, देव तेथेची जाणावा

ह्याची प्रचिती काल आली...जे आपल्या कर्तृत्वाने असंख्य लोकांच्या आयुष्यात देवासारखे आले, त्यांचे अत्यंत प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी presentation राम नवमीच्या मंगल मुहूर्तावर प्रत्यक्ष त्यांच्याकडून सिॲटल महाराष्ट्र मंडळाने (SMM) आयोजित कार्यक्रमातून आम्हाला ऐकायला मिळाले.

दीपस्तंभ फाउंडेशन मनोबलचे संस्थापक श्री यजुर्वेंद्र महाजन यांनी त्याच्या पहिल्या अमेरिका दौऱ्याचा शुभारंभ सिॲटल मधून सुरू केला हे आमचे भाग्य आहे. काल स्वतः उपस्थित राहून मनोबलच्या स्तुत्य कार्याच्या दौऱ्याचे उद्घाटन केल्याबद्दल प्रसाद पानवळकरांचे देखील मनःपुर्वक आभार.

भारतातल्या दिव्यांग, अनाथ, ट्रान्सजेंडर, ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी यजुर्वेंद्र महाजन यांनी भारतातील पहिला निवासी, निःशुल्क उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण प्रकल्प जळगाव व पुणे येथे सुरू केला आहे. दरवर्षी १८ राज्यांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना लोकसहभागातून मुख्य प्रवाहात येण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते.

पुढील महिनाभर त्यांचे अमेरिका भ्रमण सुरू आहे. ते तुमच्या शहरात येत असल्यास त्यांच्या कार्यक्रमाला आवर्जून जा, त्यांना भेटा आणि आणखी माहितीकरिता संपर्क साधा.



एक आयुष्य असंख्य आयुष्यांना नवजीवन देऊ शकते तर आपण आपला खारीचा वाटा म्हणून जास्तीत जास्त लोकांपर्यंत हा संदेश पोहोचण्याचे काम करुच शकतो अशी मी शिल्पा कर्वे, SMM अध्यक्षा व आमच्या समस्त कार्यकारिणी समितीकडून विनम्र विनंती.

- **शिल्पा कर्वे, सिॲटल महाराष्ट्र मंडळ अध्यक्षा**

## महाराष्ट्र दिन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. भाषावार प्रांत रचना या सूत्राखाली भारतातील इतर सर्व राज्ये १९५६ साली आखली गेली परंतु फक्त महाराष्ट्र आणि गुजरात एकत्र ठेवून मुंबई या राज्याच्या नावाखाली द्वैभाषिक राज्य त्यानंतर चार वर्षे अस्तित्वात होते. फक्त मराठी भाषिकांचा महाराष्ट्र असावा म्हणून आंदोलने झाली, अनेकांनी आपले प्राण दिले. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळण्यास चार वर्षे जावी लागली. हा सर्व इतिहास मी डोळ्यांनी पाहिला आहे. गेल्या ६५ वर्षात भारतातील एक अग्रगणी राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखला जातो. ही प्रगती लोक आणि त्यांचे नेते यांच्यामुळे झाली आहे. महाराष्ट्र निर्मितीनंतर ५ वर्षातच म्हणजे ३ ऑक्टोबर १९६५ रोजी इमिग्रेशन आणि नॅशनॅलिटी ऍक्ट अमेरिकन काँग्रेसने मान्य केला आणि जगातील इतर देशांप्रमाणे भारतातील विशिष्ट विषयातील पदवीधर अमेरिकेत स्थायिक होऊ लागले. त्यामध्ये मराठी भाषिकांचासुद्धा समावेश होता.

पुढील पाच वर्षात अमेरिकेतील मराठी भाषिकांची संख्या वाढू लागली आणि अमेरिकेतील मोठ्या शहरातून मराठी मंडळे १९६९ सालापासून स्थापन होऊ लागली. मी १९७४ साली अमेरिकेत स्थायिक झालो त्यावेळी उत्तर अमेरिकेत १६ मराठी मंडळे होती. प्रत्येक मंडळ आपापल्या कुवतीप्रमाणे वर्षातून चार ते सहा कार्यक्रम करू लागले. उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिकांची संख्या आणि त्यामुळे मराठी मंडळांची संख्या उत्तरोत्तर वाढतच जाणार आणि या सर्व मंडळांना जे कार्यक्रम करणे जमणार नाही ते कार्यक्रम करण्यास एखाद्या संघटित राष्ट्रीय मंडळाची गरज शिकागोतील गोडबोले, वैद्य आणि हुपरीकर या त्रयीने ओळखली आणि १९८१ साली बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेची शिकागोत स्थापना झाली. मी १९८० साली डिपार्टमेंट ऑफ नेव्हीचा कर्मचारी झालो त्यानंतर दरवर्षी मार्च महिन्यात शिकागोला एका कॉन्फरन्स साठी जात असे. त्यावेळी या त्रयीला नियमित भेटत असे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाने बृहन्महाराष्ट्र वृत्त हे हस्तलिखित मासिक प्रकाशित करण्यास १९८१ साली सुरुवात केली. या मासिकामुळे अमेरिकेतील मराठी भाषिकांशी संपर्क ठेवणे, विचारांची देवाण घेवाण करणे सोपे झाले. सुरवातीला या मासिकाचे ३०० वाचक होते. अशा विचारांच्या देवाणघेणीत मराठी समाजाची वर्षातून एकदा प्रत्यक्ष भेट झाली तर आपले प्रश्न मांडणे, त्यावर चर्चा करून उपाय सुचविणे सोपे जाईल असा विचार करून शिकागोला १९८४ साली पहिले अधिवेशन करण्याचे ठरले. सर्व उपस्थितांना ते इतके पसंत पडले कि लगेच पुढील वर्षी टोरांटो मंडळाने अधिवेशन भरवण्याची जबाबदारी उचलली. १९८५ साली टोरांटोत एक महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे संस्थापकांनी चार वर्षांनंतर नेतृत्त्व बदल करण्यास मान्यता देऊन टोरांटो च्या श्रीराम मुळगुंद यांची नवे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. त्यांनी पुढील पाच वर्षात बृहन्महाराष्ट्र मंडळाची घटना तयार करून त्यास सर्व मंडळांची मान्यता मिळवून घेतली. तेव्हापासून बृहन्महाराष्ट्र मंडळाचा कारभार या घटनेप्रमाणे चालतो आणि दर दोन वर्षांनी मंडळाला नवीन नेतृत्त्व प्राप्त होते. घटनेनुसार १९९१ साली झालेल्या लॉस एंजेलिस येथील अधिवेशनात पहिली निवडणूक झाली व मी बृहन्महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष झालो. कोणत्याही संस्थेच्या यशास असे नवीन रक्त सतत मिळत राहणे हे फार जरुरीचे असते. आज बृहन्महाराष्ट्र मंडळासारखी संस्था नुसतीच ४४ वर्षे अस्तित्त्वात नाही तर मागील पिढीनंतर तरुण पिढी पुढे येऊन मंडळाचे नेतृत्त्व करीत आहे आणि जुन्या उपक्रमांबरोबरच कालानुरूप बदलत जाणाऱ्या परिस्थितीला ओळखून नवीन उपक्रम राबवत आहे.

मराठी भाषिक म्हणून महाराष्ट्र दिन साजरा करताना अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाने लोकशाही तत्त्वाने एकोप्याने काम केले कि समाजाच्या भरभराटीस एखादी संस्था कशी उपयोगी पडते हे दाखवून दिले आहे.

**- मोहन रानडे**

## समाजकारण ते राजकारण एका अनोख्या प्रवासाची कहाणी



न्यू हॅम्पशायर राज्याचे नवनिर्वाचित आमदार आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे विद्यमान खजिनदार **श्री. संतोष साळवी** ह्यांची प्रकट मुलाखत घेण्याची संधी मला लाभली. संतोष इतर सर्व स्थलांतरित भारतीयांसारखा एक महत्त्वाकांक्षा घेऊन अमेरिकेत आला. आपल्या प्रत्येकाची एक कहाणी असते पण बहुतांशी लोक आपल्या नोकरी, व्यवसायात यशस्वी होऊन थांबतात. मात्र असे काही असतात जे इथल्या समाजकार्याशी निगडित होतात आणि फारच थोडे असतात जे

अमेरिकेत इथल्या लोकांचं प्रतिनिधित्व करतात. मुलाखतीत संतोषच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू समोर आले. एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेला संतोष लहान वयापासून सामाजिक भान ठेवणारा होता. सोसायटीतल्या मुलांना एकत्र करून वर्गणी जमवत कार्यक्रम करणारा संतोष पुढे जाऊन मोठं समाजकार्य करणार आहे हे कदाचित त्याच्या आईला तेव्हाच समजलं असावं!

संतोष अमेरिकेत आला, रीतसर नोकरीला लागला पण मंदीच्या काळात अचानक नोकरी गेली आणि आता पुढे काय हा यक्षप्रश्न पडला पण घरी सौ. श्वेताचा खंबीर पाठिंबा होता. संतोष काही महिने भारतात राहून पीपल सॉफ्ट शिकला आणि पुन्हा अमेरिकेत परतला. त्यानंतर मात्र त्याने मागे पाहिलंच नाही. स्वतःचा सॉफ्टवेअरचा व्यवसाय सुरु करून तो एक यशस्वी उद्योजक तर झालाच पण त्याचबरोबर त्याची समाजकार्याची आवड त्याला स्वस्थ बसू देणार नव्हती. मराठी शाळा, बेघर लोकांसाठी जेवण्याची सोय, कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सुरु करून २००० हून अधिक लोकांना शिक्षण अश्या अनेक सामाजिक उपक्रमात संतोषने स्वतःला झोकून दिलं. स्वतः अपार्टमेंट कॉम्प्लेक्स विकत घेऊन तिथे अनेकांना, ज्यात तुरुंगवास भोगून आलेले गुन्हेगार सुद्धा होते, त्यांना पुनर्वसनाची संधी उपलब्ध करून देणारा संतोष हा लोकप्रिय कार्यकर्ता झाला ह्यात नवल ते काय? संतोष इतका साधा आहे की त्याला कुठलीही राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती पण त्याचं सामाजिक कार्य आणि गरजूंसाठी असलेली तळमळ पाहून डेमोक्रॅटिक पक्षाच्या त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला निवडणूक लढवायला उद्युक्त केलं. निवडणुकीचा त्याचा पहिला अनुभव खरोखर ऐकण्यासारखा होता. दारोदार भटकून "कोणी मत देता का मत" अशी साद घालत त्याने आणि त्याच्या सर्व सहकारी मित्रांनी मतदारांना साकडं घातलं. अमेरिकेत राहून इथल्या मतदारांना आपल्याला मत द्यायला सांगणं ही सोपी गोष्ट नाही पण संतोषने स्थानिक समाजासाठी केलेलं कार्य त्याच्या पाठीशी होतं. मित्रांनी निवडणुकीसाठी केलेल्या अनमोल मदतीचा संतोषने मुलाखतीत आवर्जून उल्लेख केला. राजकारणातलं हे अतुलनीय यश मिळून सुद्धा संतोषचे पाय अजून जमिनीवरच आहेत. निवडून आल्यावर त्याच्या सामाजिक जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या आणि आता आपल्या मताचा आणि अधिकाराचा वापर सामाजिक उन्नतीसाठी कसा करता येईल ह्यावर तो लक्ष केन्द्रित करत आहे असं त्याने सांगितलं.

अमेरिकेतल्या प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटावा अशीच संतोषची कहाणी आहे. जानेवारीत पुण्यामध्ये संपन्न झालेल्या जागतिक मराठी संमेलनात संतोषचा यथोचित सत्कार झाला. ह्या मुलाखतीद्वारे आपल्या सर्वांना संतोषची यशोगाथा कळावी आणि त्यातून आपल्याला आणि आपल्या पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी हीच सदिच्छा. ही मुलाखत संपन्न करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रसाद पानवळकर, कार्यकारी समिती सदस्य श्री. राहुल देशमुख आणि श्री. गौरव पटवर्धन ह्यांनी सहाय्य केले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

मुलाखतीची लिंक: https://youtu.be/HvBUruKAvC0

- **नितीन जोशी, विश्वस्त समिती प्रमुख**

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

## NAFA चित्रपट महोत्सव २०२५ : सेलिब्रिटींसह सिनेमांची बहारदार पर्वणी!

उत्तर अमेरिकेतील मराठी प्रेक्षकांसाठी एक सृजनशील आणि भावविश्व समृद्ध करणारा सोहळा लवकरच आपल्या भेटीला येतोय! **NAFA मराठी चित्रपट महोत्सव २०२५** चे आयोजन २५ ते २७ जुलै २०२५ दरम्यान, California Theatre, San Jose येथे मोठ्या उत्साहात होणार आहे. NAFA (North American Film Association) आणि BMM यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात चित्रपट, चर्चासत्रं आणि थेट कलाकारांशी संवाद असं बहुरंगी रूप पाहायला मिळेल.

या महोत्सवात दर्जेदार मराठी चित्रपटांचं सादरीकरण होणार असून, त्याचबरोबर मास्टरक्लासेस, पॅनल डिस्कशन्स, वर्कशॉप्स आणि Meet & Greet यांसारखे सहभागात्मक कार्यक्रम प्रेक्षकांसाठी खुले असतील.

या वर्षीच्या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर कलाकारांची उपस्थिती. ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक **अमोल पालेकर**, आपल्या बहुढंगी भूमिकांनी प्रेक्षकांची मनं जिंकणारे ज्येष्ठ रंगकर्मी **डॉ. मोहन आगाशे**, आपल्या वास्तववादी दृष्टीकोनासाठी प्रसिद्ध असलेले राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक **मधुर भांडारकर**, नव्या संकल्पनांना व्यावसायिक सिनेमातून सादर करणारे महेश कोठारे, संवेदनशील आणि प्रभावी अभिनयासाठी प्रसिद्ध असलेले **सचिन खेडेकर**, आणि सर्वांची लाडकी अभिनेत्री **सोनाली कुलकर्णी** हे या महोत्सवात प्रमुख भूमिका बजावणार आहेत. त्यांच्यासोबतच, नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे **आदिनाथ कोठारे**, अभिनय आणि सौंदर्य यांचा सुरेख संगम असलेली **वैदेही परशुरामी**, करिष्मायुक्त गायक-संगीतकार **अवधूत गुप्ते**, अभिनयक्षेत्रातील


सशक्त नाव **अश्विनी भावे** हे देखील महोत्सवात विविध चर्चासत्रांत, मास्टरक्लासेसमध्ये व वर्कशॉप्समध्ये सहभागी होणार आहेत.
हे कलाकार त्यांच्या अनुभवातून उलगडून दाखवणार आहेत सिनेमा, अभिनय, संगीत आणि दिग्दर्शनातील वेगवेगळे पैलू – जे प्रेक्षकांसाठी एक अमूल्य शैक्षणिक ठेवा ठरणार आहेत.

NAFA २०२५ हे केवळ एक फिल्म फेस्टिव्हल नसून, हे मराठी सिनेसृष्टीच्या आंतरराष्ट्रीय उंचीवर झेप घेण्याचं सजीव उदाहरण ठरेल.🎟️ Tickets are now available!

Book your seats here: filmfestival2025.northamericanfilmassociation.org

**Group Bookings Available**, खाली दिलेला QR कोड स्कॅन करा

- **NAFA व BMM कार्यकारिणी (शब्दांकन – आशिष पाटील)**






## मराठी वैभवचा १६ वा वाढदिवस

दर शनिवारी आणि रविवारी अनेक मराठी घरांतून सकाळी दहा वाजता घडाळ्याच्या ठोक्याबरोबर मराठी वैभवचा कार्यक्रम radiodil.com वर सुरु होतो.



**शिवबांच्या हाती रुजली, म्यानांच्या पाती फुलली**
**संगीत साधने नटली,**
**जर्सीच्या अंगानी आली**
**चौखूर रत्ने उधळीत,**
**दौडता मराठी दौलत**
**वर्धिता मराठी वैभव,**
**वर्धिता मराठी वैभव!**

ह्या शीर्षक गीतापाठोपाठच, “नमस्कार रसिक श्रोतेहो” म्हणत आपले स्नेहल आणि प्रदीप वझे हे दोघे दर आठवड्याला जुन्या नव्या मराठी गाण्यांची मेजवानी घेऊन येतात. तर अश्या ह्या लाडक्या कार्यक्रमाने २०२५ मध्ये गुढीपाडव्याला १६ वर्षे पूर्ण केली. हे निमित्त साधून निरंजन देव आणि लता फडके यांनी स्नेहल आणि प्रदीप ह्यांचा कौतुक समारंभ २३ मार्च रोजी Edison, NJ मधील ‘मेजवानी’ उपाहारगृहात आयोजित केला होता. हा कार्यक्रम म्हणजे Surprise Party होती. Party चे surprise ठेवण्यासाठी निरंजन आणि लता यांना अगदी तारेवरची कसरत करावी लागली. त्यांचे आश्चर्यचकित झालेले चेहेरे पाहून सर्वांनाच अगदी भरून आले.

स्नेहलने तिच्या मनोगतात कार्यक्रमाचा जन्म व त्याचे सुरवातीचे दिवस ह्याबद्दल रोचक माहिती दिली. तर झाले असे, की मराठी गाण्यांचा कार्यक्रम रेडिओवर सादर करण्याची सूचना २००९ चे तत्कालीन मराठी विश्वाचे अध्यक्ष श्री. अशोक चौधरी ह्यांनी सभेत मांडली. सूचनेला सर्वांनीच मोठ्ठा होकार भरला. पुढच्या सभेत जेव्हा हा विषय परत चर्चेला आला तेव्हा अर्थातच ह्यावर काहीच प्रगती झाली नव्हती, कारण कार्यक्रमाचे लेखन, निवेदन, प्रसारण ह्याची तशी कोणालाच कल्पना नव्हती. अखेर कोणाचे तरी नाव लिहिल्याशिवाय ते पुढे जाणार नाही हा विचार करून अशोक यांनी स्नेहलला कामाची धुरा सांभाळण्यास सांगितले. स्नेहलने पण ‘प्रदीपला विचारून सांगते’ असे म्हणून निर्णय पुढे ढकलला. तिने प्रदीपची ‘ना’ च गृहीत धरली होती कारण ती आधीच ‘मराठी विश्व’, ‘मराठी शाळा’, ‘कौतुक’, वैगरे गोष्टींमध्ये व्यस्त होती व अजून एक जबाबदारी प्रदीप घेणार नाही असाच तिचा होरा होता.

घरी येताच स्नेहलने विषय प्रदीपपुढे मांडला. आरामखुर्चीत आराम करत असलेल्या प्रदीपना ह्या कार्यक्रमाच्या वेगळेपणाने आकर्षित केले, मग सुरु झाली भेटाभेट. स्नेहल, प्रदीप, अशोक ह्यांना रवी व वर्षा गाडगीळ सुद्धा येऊन मिळाले. रेडिओ स्टेशन बरोबरच्या चर्चेमध्ये कार्यक्रमाचे नाव आणि शीर्षक गीताचा प्रस्ताव मांडला. ह्या सर्वांनी मिळून कार्यक्रमाचे ‘मराठी वैभव’ असे नामकरण केले. रवी ह्यांनी तिथेच झटकन शीर्षक गीत सुद्धा लिहिले. किशोर रानडे ह्यांनी ते संगीतबद्ध करून, प्रशांत गिजरे, महेश लाड, ऋचा जांभेकर ह्यांनी ते गाऊन ध्वनीमुद्रित केले.

सुरवातीला स्नेहल आणि वर्षा दोघीही हा कार्यक्रम करीत असत. पण गेले काही वर्षे हा कार्यक्रम वझे कुटुंबीय करत आहेत. दर आठवड्याला रसिकांच्या फर्माइशीनुसार विषय सुचवले जातात व रसिकांकडून गाणीही whatsapp वर घेतली जातात. ह्या गाण्याच्या फर्माइशींमधून जुनी नवी गाणी निवडून स्नेहल कार्यक्रमाचा गजरा विषयानुरूप निवेदनाने छान गुंफते. तर प्रदीप नभोवाणीचे क्लिष्ट तंत्रकला सांभाळतात. कुठे क्लिप कट करायची , कुठे pause टाकायचा, रेडिओच्या विविध गुंड्या बरोबर फिरवून आवाजाचे सातत्य राखायचे हे तर प्रदीप बघतातच पण स्नेहलने सांगितल्याप्रमाणे, तिच्या लेखनाचे प्रथम टीकाकार हे प्रदीप आहेत. लेखन हे विषय सूत्राला धरून ठेवणे, वाहवत जाऊ न देणे व रसाळ निवेदन रटाळ होऊ न देणे ह्याची ते कसोशीने काळजी घेतात. अश्याप्रकारे मराठी वैभवच्या ह्या रथाचे सादरीकरण स्नेहल तर सारथ्य प्रदीप करत आहेत.

गाणी आपण तशीही ऐकतोच पण स्नेहलची उत्कृष्ट लेखनशैली व रसाळ निवेदन हेच कारण प्रामुख्याने सलग १६ वर्षे रसिकांना ह्या कार्यक्रमाबरोबर जोडून ठेवायला कारणीभूत ठरले आहे. त्यामुळेच RadioDil स्टेशन वरील मराठी वैभव हा सर्वात जास्त ऐकला जाणारा कार्यक्रम आहे. बरं, हा कार्यक्रम काही नुसता गाण्याचा नाही बरे. स्नेहलने धनश्री लेले, Dr. राजू बोडस ह्यांच्या मुलाखती, मनोव्यथा, मायमराठीचा सन्मान, द्वैभाषिक गाणी यासारखे अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम सुद्धा केले आहेत.

१६ व्या वाढदिवसाला मराठी विश्वचे अनेक माजी अध्यक्ष शकुन पानसे, पुनीत मराठे, माधुरी जोशी, अशोक चौधरी, स्मिता साठे, विलास सावरगावकर आणि निरंजन देव हे उपस्थित होते. RadioDil वरील गीतबंदीशचे सूत्रधार अशोक देशपांडे हे सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते. अनेक रसिकांनी आपले मराठी वैभववरचे प्रेम लेख, कवितांच्या स्वरूपात वाचून दाखवले. त्यातील ह्या २ कविता:

**मराठी वैभवची मैत्रीण वर्षा जोशीने रचलेले हे काव्य**

उधळण केली सुरसुमनांची, भक्ती-भाव अन् नाट्य पदांची
सोळा वर्षे नियमित वृष्टी आनंदाची मात्र!
अभिनंदन करितो प्रदीप स्नेहल मराठी वैभव मित्र!
दर शनि-रवी नवीन सूत्र, सातत्याचे सलग सत्र
मराठी संगीत प्रेमींसाठी उभारले हे छत्र
अभिनंदन करितो प्रदीप स्नेहल मराठी वैभव मित्र!
माय मराठीची ही सेवा, नाही कुणांप्रती हेवा दावा
नव्या जुन्या गीतांचा ठेवा, पोहोचूदे सर्वत्र
अभिनंदन करितो प्रदीप स्नेहल मराठी वैभव मित्र!
स्वयंसेवेचा धरिला ध्यास, शिस्तबद्ध हा अथक् प्रवास
प्रदीप्त उज्ज्वल स्नेह बंधना शुभेच्छांचे हे पत्र
अभिनंदन करितो प्रदीप स्नेहल मराठी वैभव मित्र!

**मराठी वैभवची मैत्रीण सुजाता कुलकर्णीने रचलेले काव्य**

वर्षा, माधुरी संध्याकडून कानावरती होते आले
मराठी वैभवचे कार्यक्रम, लिंक द्वारा होते ऐकले ।
मराठी विश्व, महाराष्ट्र फौंडेशन, शाळा, मुव्ही नाईट्स, "कौतुक" होते
ऐकले BMM चे सुग्रास भोजन तर आम्ही स्वतःच अनुभवले ।।
मग वर्षानेच मनावर घेऊन गाठ घालून दिली
मराठी वैभवाचे रसिक मित्र मैत्रीण मिळाली
आम्हा बिरुदावली ।
रसिकांच्या ह्या परिवारात सहज सामील झालो
शनिवार/रविवार सकाळची वाट नकळत पाहू लागलो ।।
दर वेळी नवे सूत्र, सुंदर श्रवणीय गाणी
अभ्यासपूर्ण चपखल निवेदन तासाभराची खरीखुरी "मेजवानी"।
डॉक्टर कुणी येती कधी, कधी एकलचे छोटे शिलेदार
धनश्री ताईंची मुलाखत कधी, प्रत्यक्ष कार्यक्रम बहारदार ।।
तुमचे सातत्य तुमचा अभ्यास तुमचे परिश्रम मनापासून कदर
"जगात भारी" जोडप्याबद्दल मनात अपार आदर ।
अशीच दिमाखदार वाटचाल, होत राहो तुमची आणि
मराठी वैभवची
सोळाव्याच्या शुभेच्छा देताना वाट पाहतो
पंचविसाव्या वाढदिवसाची ।।

निरंजन देव ह्यांनी surprise party साठी स्नेहल आणि प्रदीप ह्यांना घराबाहेर काढण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागले, डॉ. मोहन आगाशेंपासून अनेक मित्र मैत्रिणींना कशा थापा माराव्या लागल्या हे विनोदी पद्धतीने सांगून रसिकांचे मनोरंजन केले.

अशोक चौधरी ह्यांनी मराठी विश्वाच्या कार्यकारी मंडळात असताना स्नेहलबरोबर कशी तात्विक भांडणे होत असत हे सांगितले. त्याचप्रमाणे कुठच्याही कार्यक्रमाला स्नेहल आणि प्रदीप मनापासून मदत करायला सदैव तत्पर असत व म्हणूनच हा कार्यक्रम त्यांच्याकडे सोपवणे कसे संयुक्तिक होते हे ही आवर्जून सांगितले.



शिरीष नाडकर्णी, एडिसन मराठी शाळा प्रमुख ह्यांनी डॉ. नूतन नाडकर्णी आणि वझे दापंत्याची जवळीक ही मराठी शाळा चालवण्यामुळे कशी वाढली, तसेच त्यांच्या अनेक उपक्रमांमुळे त्यांचे घर हे सर्वांसाठी कसे नेहमीच खुले असते हे नमूद केले. त्यामुळे त्यांची भावना 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' अशीच होती.

डॉ. संदीपा उत्पात हिने देखील आपल्या भाषणात स्नेहलचे सुमधुर निवेदन आणि त्याला लाभलेली प्रदीप ह्यांची स्थिर व समर्थ साथ ह्याचा उल्लेख केला तसेच ह्या कार्यक्रमाची तुलना रेडिओवरील बिनाका गीतमाला आणि जयमाला ह्या कार्यक्रमांबरोबर केली.

मेजवानी मधील चविष्ट मराठमोळ्या जेवणाने कार्यक्रमाची रंगत अजूनच वाढली.

आपल्या लाडक्या कार्यक्रमाने तारुण्यात प्रवेश केलाय व त्याची घोडदौड अशीच पुढे चालू राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

तुम्हाला हा कार्यक्रम radiodil.com वर दर शनिवारी आणि रविवारी १० वाजता EST ऐकायला मिळेल.

**- शीतल पाटील, न्यू जर्सी**

## अर्थमंथन

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या 'अर्थमंथन' या उपक्रमासाठी नुकतेच बोधचिन्ह बनवण्यात आले. अर्थविश्वा मधील महत्त्वाची चिन्हे वापरून हे बोधचिन्ह बनवले आहे. मिशिगन मधील ग्रँड रॅपिड्स या शहरातील रूणाली पाटील यांनी हे बोधचिन्ह साकारले आहे.



## मराठीच्या खजिन्यातली फारसी दौलत

"तुफानी पावसात प्रयत्नांची शिकस्त करून मी सदर बाजारातील शाळेच्या इमारतीत कसाबसा शिरलो व हजेरीपटावर सही करून मुलाखतीसाठी खोळंबलेल्या उमेदवारांची माफी मागितली."

मी जर का विचारलं की वरील वाक्यात विशेष असं काय आहे तर काही जण पटकन सांगतील की त्यात एकही इंग्रजी शब्द नाही. हे जरी खरं असलं तरी त्यात आणखी एक खास गोष्ट नजरेस येईल. ती म्हणजे त्या वाक्यातले १० शब्द हे फारसी भाषेतले आहेत. आपल्यापैकी कित्येकांना सांगूनही खरं वाटणार नाही इतके फारसी शब्द मराठीने आत्मसात केले आहेत. हे कसं काय घडलं ह्याची रंजक हकीगत जाणून घेऊया.

सन १३१२ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवांचं राज्य खालसा केलं व त्यानंतर १६७४ मध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंत म्हणजेच ३५० वर्षांपेक्षा जास्त काळ महाराष्ट्रावर विविध मुसलमान पातशहांचा अंमल होता. ह्या मुसलमान राज्यकर्त्यांच्या जुलुमाखाली महाराष्ट्र भरडला गेला. त्यांच्या आक्रमणाचं समर्थन कोणीच करणार नाही. पण त्यांच्या राज्यकारभाराची भाषा ही फारसी असल्यामुळे तिने अगदी नकळत महाराष्ट्राच्या समाजजीवनात प्रवेश केला. ह्याच काळात फारसीचा मराठीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला जो आजतागायत दिसून येतो. त्यामुळे मराठीला फारसी शब्दांची नजाकत मिळाली व ती आणखी समृद्ध झाली.

भाषाविज्ञानाप्रमाणे मराठी ही इंडो-आर्यन गटातील व फारसी ही इंडो-इराणियन गटातील भाषा आहे. हे दोन्ही गट इंडो-युरोपियन ह्या समूहात येतात. त्या अर्थाने मराठी आणि फारसी ह्या भाषा-भगिनी आहेत. त्यामुळेच जेव्हा ह्या दोन्ही भाषा एकमेकींच्या संपर्कात आल्या तेव्हा त्यांची वीण इतकी घट्ट जुळली की ती अजूनही उसवलेली नाही. मुद्दाम उल्लेख करण्याजोगी गोष्ट म्हणजे अरबी आणि तुर्की ह्या परकीय भाषांचाही मुसलमानी राज्यकर्त्यांमुळे मराठीशी संपर्क आला. पण त्या भाषांमधले शब्द फारसीच्या माध्यमातून मराठीत आले. त्या दोन्ही भाषांचे भाषावैज्ञानिक समूह वेगळे आहेत.

आता फारसीने मराठीवर किती वेगवेगळ्या प्रकारे छाप सोडली आहे ते विस्ताराने बघूया. 'लोकशाही' मधील 'शाही', सरकार, आमदार, खासदार, तहसील, जकात, वसुली, राजीनामा, सवलत, सल्ला, साहेब, शिक्का, सनदशीर, हफ्ता, हुकूम, रयत हे सर्व मूळचे फारसी शब्द.

कवी राजा बढे ह्यांनी लिहिलेल्या महाराष्ट्र राज्याच्या राज्यगीतातील ह्या ओळी बघा - अस्मानाच्या सुलतानीला जवाब देती जीभा, दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा. महाराष्ट्राच्या शौर्याचं यथार्थ वर्णन फारसी शब्दांमधूनच होत आहे.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते शिवाजी महाराज ह्यांच्या आजोबांनी — मालोजी राजांनी — त्यांच्या मुलांची शहाजी आणि शरीफजी ही फारसी नावे एका सुफी संतावरून ठेवलेली आहेत. अशी इतरही बरीच नावे आपल्याला आढळतात — शाहू, बाजीराव, सर्जेराव, हिंमतराव, खुशालचंद, फकीरचंद, फत्तेसिंग, दौलतराव. पेशवा ही पदवी सुद्धा फारसीमधलीच! सध्या प्रचलित असलेली आडनावे बघा — सराफ, चिटणीस, फडणवीस, पोतनीस, दिवाण, मिरासदार, दफ्तरदार, कारखानीस, ठाणेदार, डबीर, रास्ते, पागे, सुभेदार, सबनीस. अशी ६० पेक्षा जास्त आडनावे विविध बखरींतून आढळून येतात.

सध्या अहमदनगर, औरंगाबाद ह्यासारखी गावांची नावे बदलण्यात येत असली तरी किल्ले रायगड, मौजे पुरंदर असे शब्द वापरण्यात येतात. ते खरंतर किल्ला-इ-रायगड, मौज-इ-पुरंदर असे फारसी षष्टी विभक्तीचे प्रत्यय आहेत. त्याप्रमाणे गावांना खुर्द आणि बुद्रुक म्हणण्याची प्रथाही फारसी आहे. तसंच काही शहरातल्या विविध भागांना असणारी नावे बघा — उस्मानपुरा, गंज पेठ, फरासखाना, बेगमपुरा, महाल, हजारीबाग, रोशनगेट, हुजूरपागा.

युद्ध आणि लष्करविषयक शब्द खूप जास्त प्रमाणात रुळलेले आहेत असं आपल्याला दिसेल. पुढील काही शब्द बघा — कवायत, एल्गार, कत्तल, कैद, खलिता, काबीज, खलबत, खोगीर, कावा, गनीम, गस्त, जखमी, जरब, दगा, तोफ, नौबत, फत्तेशिकस्त, बाजारबुणगे, मोहरा, शिबंदी, मुकाबला, हल्ला.

काही बांधकाम विषयक शब्द बघूया — कमान, जमीन, चौथरा, घुमट, गिलावा, डागडुजी, तक्ता, तबेला, दरवाजा, दवाखाना, पूल, फरशी, बोगदा, मनोरा, महिरप, हौद, हवेली.

काही कायदे विषयक शब्द पुढीलप्रमाणे — गुन्हा, खुलासा, जामीन, तक्रार, दाद, फिर्याद, दावा, दिवाणी, फौजदारी, फरार, हक्क, लवाद, वारसा, हवाला, हिस्सेदार. फारसीमधून आलेले असे कितीतरी शब्द आपण नकळत मिरवत असतो.

आता काही समाजजीवनाशी निगडित शब्द बघूया — अफवा, अब्रू, कंगाल, ऐपत, ऐष, इज्जत, जाहिरात, गराडा, दगाबाजी, दंगल, दलाल, जबाबदारी, जबरदस्ती, दाखला, नजराणा, फकिरी, फजिती, फर्मान, पडदा, मालक, रवानगी, रोषणाई, वसाहत, वजन, शर्यत, वस्ताद, शाबासकी, शामियाना, हलाखी, शिफारस. एखाद्या भाषेत नुसते शब्द येत नाहीत तर त्यांच्या बरोबर संकल्पना आणि

अनुभव येतात जे खऱ्या अर्थाने भाषा समृद्ध करतात. म्हणूनच हे भाषिक आदानप्रदान अत्यंत जरुरीचे आहे. ह्यातल्या प्रत्येक शब्दाला स्वतःचं एक अढळ स्थान आहे.

काही वस्त्र, अलंकार व तत्सम शब्द बघूया — झुमका, जवाहीर, पैलू, दागिना, अस्तर, चादर, जरतारी, किनार, रेशमी, जर्दोजी, झबलं, तंबू, तागा, रुमाल, बुट्टेदार, मुलायम, शेरवानी, सदरा, सुरवार, किनखापी, रजई, रफू, शाल. अशा कित्येक शब्दांनी मराठीच्या खजिन्यात नक्कीच मोलाची भर घातली आहे.

शब्दांची ही यादी प्राणी, शेती, व्यवसाय, औषधे, अवजारे, संगीत, मनुष्यस्वभाव, वाहतूक, राज्यकारभार अशा आणखी अनेक गटांमध्ये पसरली आहे. जीवनविषयक सर्व अंगांना व्यापून टाकणारी आहे. अगदी संतसाहित्यातही फारसी शब्दांचा वापर आढळून येतो.

काही अभंगातल्या ओळी पुढीलप्रमाणे — संत चोखामेळा ह्यांचा अभंग — अबीर गुलाल उधळीत रंग, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग. ह्यातले अबीर, गुलाल हे दोन्ही फारसी आहेत.

संत गोरा कुंभार ह्यांचा अभंग — अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर. ह्यातला गजर हा फारसी आहे.

ज्ञानेश्वरीत फारसी शब्द आढळून येत नाहीत पण संत एकनाथांच्या साहित्यात फारसी शब्द सापडतात. संत एकनाथ हे ज्या पैठण नगरीत वास्तव्याला होते तिथे मुसलमानी सत्ता होतीच आणि त्या काळात तिचा अंमल अधिकाधिक गडद होत चालला होता. संत रामदासांच्या साहित्यात दोनशेच्या वर फारसी शब्द आढळतात. ह्यात आश्चर्य वाटण्याची गोष्ट नाही कारण आपल्या सर्व संतांनी त्यांच्या साहित्य निर्मितीसाठी लोकव्यवहारातील भाषेचा उपयोग केला आहे. त्यामुळेच त्यांचे साहित्य लोकप्रिय होऊन सर्वतोमुखी पोचले.

तसंच फारसीने मराठी इतिहास लेखकांना मोलाचं मार्गदर्शन केलं आहे. त्यामुळेच निरनिराळ्या बखरी आणि सनदा ह्यांच्यामार्फत मराठीत मोठ्या प्रमाणात इतिहास लेखन झालं आहे. त्यानिमित्ताने एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे. मुसलमान राज्यकर्त्यां पूर्वी विविध वस्त्रे, ताडपत्रे, भूर्जपत्रे अशा माध्यमातून मजकूर लिहिण्याचे काम होत असे. कालांतराने कागदाचा वापर सुरु झाला. फारसी मजकूर हा नस्ख आणि शिकस्ता अशा २ लिपीत लिहिला जात असे. नस्ख अक्षरे सुवाच्य असतात तर शिकस्ता अक्षरे मोडून लिहिलेली असतात. फारसीत शिकस्तन हे क्रियापद आहे ज्याचा अर्थ मोडून लिहिणे असा आहे. त्यावरूनच हेमाडपंताने मराठीत अक्षरे मोडून लिहायची पद्धत सुरु केली. त्या लिपीलाच 'मोडी' लिपी असे म्हणतात. मोडी हे शिकस्ता ह्या फारसी शब्दांचे भाषांतर आहे. त्यामुळे कागदावर जास्त वेगाने मजकूर लिहिला जाऊ लागला. अशा प्रकारची मोडी लिपी ही भारतात देवनागरी लिपीच्या आधी फक्त मराठी भाषेत वापरली. यावरून आपल्याला हेही दिसून येतं की महाराष्ट्रातले लोक हे पूर्वीपासूनच खूप प्रागतिक होते.

फारसीचा परिणाम शाहिरी वाङ्मययावर झाला. शाहीर हा शब्दच अरबी भाषेतील 'शायर' ह्या शब्दावरून आला आहे. ह्या काव्यप्रकाराने शिवकाल व पेशवेकाल असे २ मोठे कालखंड व्यापले आहेत. फक्त शाहीर ह्या शब्दाखेरीज हा काव्यप्रकार अस्सल मराठी संस्कृतीचे दर्शन घडवतो. त्याबरोबरच लावणी किंवा तमाशा ह्या लोककलेतही फारसीचा अंदाज दिसून येतो. तमाशा हा शब्दच फारसी आहे. इतकंच काय तर सवाल-जवाब, कलगी-तुरा, मुजरा हे शब्दही फारसी आहेत. इष्क, आईना, दिल, नजर, पेश, आशक, अदा, डौल अशा अनेक शब्दांची पेरणी तमाशा गीतांतून आपल्याला बघायला मिळते.

आजघडीच्या चित्रपटांच्या गाण्यांमध्येही असे काही फारसी शब्द वापरले जातात की एखाद्या गाण्याचा नूरच पालटला जातो — चिंब पावसानं रानं झालं आबादानी. ह्यातल्या 'आबादानी' ह्या शब्दानं अशी काही जादू केली आहे की पावसामुळे ओतप्रोत भरलेलं निसर्गाचं रूप डोळ्यासमोर अलगद आल्यावाचून राहत नाही. हा शब्द परका तर वाटत नाहीच पण ह्याची जागा दुसरा कोणताच शब्द घेऊ शकणार नाही हेही पटतं.

अधिक खोलात जाऊन मराठीच्या व्याकरणात डोकवायचा प्रयत्न केल्यास नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, अव्यय, क्रियाविशेषण, समास अशा सर्व शब्दरूपांवर फारसीचा प्रभाव दिसून येईल. उदाहरणादाखल बघायचं झालं तर 'ना' ह्या उपसर्गाची विशेषणे बघूया — नालायक, नामंजूर, नाउमेद, नादान, नाखूष, नाकबूल, नाईलाज. तसेच 'बे' ह्या उपसर्गाची विशेषणे बघूया — बेईमान, बेसुमार, बेदम, बेफिकीर, बेशरम, बेकार, बेकायदा. ही यादी खूपच मोठी आहे.

आपल्या इथे भाषा शुद्धीकरणाचेही काही प्रयत्न झाले आहेत. गरजेप्रमाणे नवीन पर्यायी व पारिभाषिक शब्द तयार करण्यात काहीच चूक नाही. पण लोकप्रिय व सुलभ शब्दांना केवळ ते परभाषेतील आहेत म्हणून डावलून संस्कृतप्रचुर क्लिष्ट शब्द योजण्यात काय हशील? वकील आणि कारकून हे फारसीच्या प्रभावातून सर्रास वापरले जाणारे २ शब्द. त्यांच्या ऐवजी अनुक्रमे विधिज्ञ आणि लिपिक हे थोपवलेले शब्द आपल्यापैकी किती जण वापरतात? त्यातून भावनातिरेक व संकुचितपणा दिसतो. अशाने आपणच आपल्या हातांनी मराठीचे नुकसान करतो.

वरील सर्व विवेचनावरून दिसून येईल की मराठीच्या खिदमतीस अनेक फारसी शब्द व त्यांच्या लकबी गेली ६०० वर्षे तैनात आहेत. त्यांनी मराठीच्या वैभवात नक्कीच मोलाची भर घातली आहे. केवळ एक परकीय भाषा म्हणून फारसीकडे तुच्छतेने बघण्यात काहीच अर्थ नाही. आजच्या जगात निरनिराळ्या भाषांमधल्या जाणीवा जास्तीत जास्त प्रमाणात मराठीत कशा येतील व त्याद्वारे मराठीची श्रीमंती कशी वाढेल त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

- **अमित भावे,** गार्डन ग्रोव, कॅलिफोर्निया

## राम नवमी

तिथी हो नवमी | रामाच्या जन्माची ||
वेळ मध्यान्हाची| चैत्र शुद्ध ||१||
अयोध्या नगरी | दशरथ पिता ||
कौशल्या माता | धन्य झाले ||२||
भाग्य भारतात | विष्णु अवतार ||
जाहले साकार | अयोध्येत || ३||
वसंत साजरा | चाहूल ग्रीष्माची ||
वेळ आनंदाची | राम नाम || ४||
सडा संमार्जन | हार फुले शोभा ||
मंदिराच्या गाभा | पूजा चाले ||५||
भावना मनात | नसावी द्वेषाची ||
प्रार्थना आमची | म्हणे रेखा ||६||

- **सौ. रेखा मुळे,** मनालापन, न्यू जर्सी




## शांतता दोघातली

“आई माझा डबा दे” “अगं माझा फोन कुठे गेला?” “थांबा दोन मिनिट देते” “चला चला शाळेला उशीर होतोय.” “चला पटापट मग ट्रॅफिक वाढेल.” हुश्श. मुलांना शाळेत सोडायचे आणि घरी येतानाच दिवसभराच्या कामांची यादी करायची. परत दुपारी घ्यायला जायचे. मुलांची शाळा, क्लास, स्वयंपाक! धकाधकीत दिवस कसा जायचा हे कळायचे सुद्धा नाही. दिवसा मागून दिवस, महिने आणि वर्ष कशी गेली हे कळलंच नाही.

अचानक एके दिवशी सकाळ निवांत झाली. मुलं कॉलेजला गेली आणि घर एकदम शांत झाले. साडे सात वाजले. अरे बाप रे! उशीर झाला उठायला! लगबगीने किचनमधे गेले आणि हे म्हणाले, “उठलीस का? तुझ्यासाठी चहा केला आहे.” खूप बरं वाटलं. चला आज निवांत न्यूज बघते. छान न्यूज बघत चहा पिऊन आवरायला गेले तेवढ्यात हे तयार होऊन आले आणि ऑफिसला जायला निघाले. आज मन शांत नव्हते. सारखं चुकल्या चुकल्या सारखं वाटत होते. काही तरी राहत होते पण नक्की काय ते कळत नव्हते. आज कामं करायची भरपूर होती पण सुरुवात कुठून करू हे समजत नव्हते. मुलं काय करत असतील? त्यांना फोन करते. करू का त्यांना फोन? त्यांची लेक्चर सुरू असतील का? नको आधी लोकेशन बघते. अरे दोघेही कॉलेजमध्ये आहेत! जाऊ दे नको फोन करायला. मग काय करू? TV बघू? नको काही तरी खाते. नको खूप काम आहे. विचार करत असताना मैत्रिणीचा फोन आला. मग काय? सवयी प्रमाणे बोलता बोलता कामाला लागले. रात्री मुलांशी बोलणे झाले आणि बरे वाटले. Facetime मुळे किती बरे आहे ना? समोरच्या व्यक्तीला बघू शकता, त्यांच्याशी बोलू शकता. मुलं लांब असल्याचे जाणवत नाही.

दुसरा दिवस उजाडला परत नवी सकाळ, परत काही सुचत नव्हते. मग गाणी लावली आणि ऐकत ऐकत काम सुरू झाले. अशी हळूहळू नवीन रूटीनची सुरुवात झाली. “अहो हा शर्ट आता जुना झालाय. किती वेळा घालता?” “शी बाई हे खण किती घाण झालेत. शेवटी कधी आवरले होतं?” आता जाणवायला लागले की आपलं लक्ष नवऱ्याकडे, घराकडे जायला लागले आहे. मुलं व्हायच्या आधीचे दिवस आठवले. तसेच आता पण घरात फक्त दोघे.

तेवढ्यात Thanksgiving आला आणि मुलं घरी आली. एक दिवस गप्पा मारत होतो तेव्हा मुलीने विचारले, “आई तुझा दिवस कसा गं जातो?” मी सांगितल्यावर म्हणाली, “अगं आई आता तुला स्वतःवर वेळ द्यायला हवा. तुला आता तुझ्या आवडत्या गोष्टी करायला

हव्यात.” तिने मला एक embroidery kit आणून दिला. मग माझा दिवस उगवायचा आणि मला ओढ असायची की कामे पूर्ण करून माझा छंद जोपासायची. गाणी ऐकत सुंदर फुल विणायला घेतलं की प्रसन्न वाटायचं. मग हे आल्यावर चहा, निवांत गप्पा, जेवण, वॉक आणि टीव्ही असे नवीनच रूटीन सुरू झाले. जुने दिवस आठवू लागले, तसेच तरुण असताना स्वतःचा दिसण्यावर, कपड्यावर लक्ष जायचे तसे आता ही जाणवू लागले. टीप-टॉप राहण्यावर मैत्रिणीने चक्क complement दिली. ती म्हणाली, “इतका वेळ तू फक्त आई होतीस, आता तू एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहेस.”

असा हळूहळू स्वत:चा शोध घ्यायची सुरुवात झाली आहे. नवऱ्याच्या साथीने जीवनाचा नवीन अध्याय सुरू झालाय. परवा असेच दोघे चहा पीत बसलो होतो. कोणी काही बोलत नव्हते. फक्त शांतता होती. मन परिपूर्ण होते. मला अचानक गाण्याच्या ओळी आठवल्या. ‘दरवळाया लागली ही शांतता दोघातली.’

- **सौ. सुवर्णा हर्षे,** टेम्पा, फ़्लोरिडा

## मातृत्व - एक वैश्विक भावना

।।मातृ दिनस्य शुभाशयाः।। “मातृदिन” म्हणा की “Mother's Day” म्हणा तीच भावनिकता, तीच ओढ, तीच श्रद्धा, तीच जवळीक. आई म्हणाली की नेहमी सगळेच व्यक्त होतात की आई बरोबरचे प्रत्येक क्षण मोलाचे असतात. पहिल्यांदा आई बरोबर क्षण घालवले म्हणून ते सुंदर आणि नंतर तेच क्षण आठवून त्यांचे भावनिक महत्व अजूनच वाढते. आई, माता हा विषयच सगळ्यांच्या काळजाचा ठाव घेणारा असतो. आई ही स्वत: खुपच स्वत:च्या भावनेचा समतोल साधते, म्हणजे कधी प्रेमाचा ओलावा व्यक्त करायचा तर कधी शिस्तिचा खाक्या दाखवायचा. इतके असूनही कधीही प्रेमाचा झरा आटलेला दिसत नाही.

प्रत्येक आईच आपल्या मुलांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रेरीत करत असते. त्यासाठी त्यांना नेहमीच प्रोत्साहित करत असते. याक्षणी मला माझ्या आईचे वाक्य आठवते. आम्ही भावंडे लहान होतो तेव्हा म्हणायची कि पुढे जायचे म्हणजे मनगटात बळ असले पाहिजे. त्या वेळी फारसे कळले नव्हते, पण जसे मोठे होत गेलो तसा त्याचा अर्थ कळत गेला आणि नकळत आईने आमच्या मनगटात दिलेले बळ आठवले. हिरकणीने स्वतःच्या मुलासाठी केलेले अजब साहस तर जगजाहीरच आहे. शिवाजी महाराजांची आई, जिजाबाई, त्यांना नेहमी आत्मविश्वास आणि स्वावलंबन शिकवायच्या. याचं महत्त्व शिवाजी महाराजांना जीवनभर जाणवलं आणि तेच त्यांच्या महानतेचा पाया ठरले. राधाबाई, वीर सावरकरांची आई, त्यांच्या मार्गदर्शनामुळे सावरकरांनी आपल्या जीवनातील प्रत्येक पावलावर देशभक्ती आणि आत्मनिर्भरतेची शिकवण घेतली.

आईचे प्रेम हे निर्व्याज प्रेम असतं, कोणत्याही अपेक्षांपासून मुक्त असतं. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आईची भूमिका मार्गदर्शन करणारीच असते. आई तिच्या कुटुंबात शांती आणि प्रेम निर्माण करते त्यासाठी तिचे नेहमीच अथक परिश्रम असतात. कुटुंबातील स्थिरता, शांती, प्रेम अढळ राहण्यासाठी तिचे हे अथक परिश्रम नेहमीच पडद्याआडचे असतात. ती म्हणजे एक बंध असतो की ज्यामुळे सगळीजण एका अनामिक बंधाने बांधलेले असतात.

आई म्हणजे आपले जीवन घडवणारी, काळजी घेणारी, मार्गदर्शन करणारी. आई, मग ती मनुष्याची असो की पशुपक्ष्यांची आई; तीच काळजी, तेच प्रेम आपल्याला दिसते. यावरूनच कळते की आई ही भावना सार्वत्रिक आहे, जी सगळ्या ठिकाणी सगळ्यांच्यातच आपल्याला दिसून येते, मग ती मनुष्यजमात असो की प्राणीजमात असो. “Mother Teresa” ज्यांना सेंट टेरेसा म्हणूनही ओळखलं जायचं, त्यांनी संपूर्ण जगाला मातृत्वाच्या प्रेमाचं आणि त्यागाचं एक अप्रतिम उदाहरण दिलं. त्यांच जीवनच उदाहरण म्हणून घेता येईल की, "आई" ही भावना म्हणजे केवळ शारीरिक जन्म देणारी असलेली एक व्यक्ती नाही, तर ते सर्व मानवतेच्या सुसंस्कारित प्रेमाचं प्रतीक आहे.
आई मध्ये मुलांच्या संरक्षणाची, संगोपनाची भावना जन्मजातच असतें. त्यासाठी अनेकदा आपल्या मुलांची काळजी घेताना ती स्वत:च्या गोष्टींचा त्याग पण करते, तीच संरक्षणाची भावना आपल्याला प्राण्यांच्यात दिसते. वाघीण तसेच हत्तीण आपल्या पिलांच्या संरक्षणासाठी जीवाचे रान करते. तसेच मानवी माता आपल्या मुलांच्या कल्याणासाठी शारीरिक, भावनिक, आर्थिक त्याग करते. तीच भावना सालमन माशामध्ये दिसते. अंडी घालण्यासाठी सालमन मासा त्याची सगळी शक्ति पाण्याच्या विरुध्द दिशेने पोहण्यात घालवतो म्हणजे आपल्या पिल्लांसाठी अगदीच जीवाचे रान करतो. आईचे मुलांवरचे प्रेम हे बिनशर्त असते, तेच बंध आपल्याला Polar Bear आणि तिच्या मुलांमध्ये दिसतो, आई मुलांना स्वतंत्रपणे जगाचा सामना करण्यासाठी आत्मनिर्भर बनवते तोच गुण चित्तिण तिच्या मुलांना पण आत्मनिर्भर बनवण्यात दिसतो. यावरून समजते की,
आई म्हणजे प्रेम... आई म्हणजे समजुन घेणारी... आई म्हणजे आपुलकी .... आई म्हणजे संरक्षणाची भावना

जगाच्या पाठीवर आपण कुठेही गेलो तरी सर्व जनमानसात, सर्व घरात, सर्व पंथात आपल्याला तोच भाव दिसतो आणि परत तोच

भाव आपल्याला प्राणीमात्रात पण दिसून येतो. आई ही भावना, आई हे मातृत्व, तिने शिकवलेला स्वाभिमान हे सगळे आपल्याल्या प्रतिकात्मक रूपात जगातल्या भौतिक घटकात पण दिसून येते. जसे की पर्वत, पाणी, झाडे, अग्नी, सूर्य असे बरेच काही. हे सगळे प्रतिकात्मकपणे आईची भूमिका, स्वाभिमान, संगोपन आणि भावनिक शक्तिच्या संबंधित गुणांचे प्रतिनिधित्व करतात. हे सगळे मातृत्व आणि वैयक्तिक पातळीवरची महत्त्वाची असलेली लवचिकता, शहाणपण प्रेम प्रतिबिंबित करतात. जसे की आई सारखी ताकद आणि संरक्षण पर्वतराजी देतात, झाडांची मुळे आधार, स्वाभिमान, शक्तिशालीचे प्रतिक. आई सारखी भावनिकता पाण्याच्या प्रवाहात पण दिसते. पाण्याचा संबंध बहुतेक वेळा पोषण, भावनिक प्रवाह आणि निर्मळतेशी जोडला जातो. अग्नि, आग ही उत्कटता, परिवर्तनाचे प्रतिक; ती जणूकाही आईच्या आंतरिक शक्ती, उर्जेचे प्रतिबिंब आहे. सूर्याला अनेकदा पालनपोषण, ऊर्जा, जीवन देणाऱ्या शक्तीचे प्रतिक म्हणून पाहिले जाते. तर सूर्याप्रमाणेच आई आपल्या मुलांना उर्जा देते, ज्यामुळे त्यांना वाढण्यास आणि भरभराट करण्यास सक्षम बनवते.

अशा तऱ्हेने मातृत्वाची ही भावना आपल्याला सर्वत्र दिसते, ती वेगवेगळ्या स्वरूपात प्रगट झालेली दिसते. मग तो मानवी अनुभव असो की प्राणी जगतातला किंवा नैसर्गिक जगतातला. संगोपन, संरक्षण, निर्मिती, काळजी - जीवनाची ही तत्वे जीवनाच्या श्वाश्वतेसाठी, भरभराटीसाठी अविभाज्य आहेत. तीच जीवन टिकवून ठेवण्यात भौतिक आणि भावनिक दोन्ही जगात स्वत्वाची वाढ होण्यास मूलभूतपणे मातृत्वाची भूमिकाच दर्शवतात.

ग्लाडिस मॅकोझा, नेल्सन मंडेलाची आई. ती एक सामान्य महिला होती, पण तिच्या मातृत्वाच्या शक्तीने आणि शिकवणीने नेल्सन मंडेला जीवनभर प्रेरित झाले. तिच्या शिकवणींनी मंडेलांना एक महत्त्वाची शिकवण दिली, "मातृत्व म्हणजे कुटुंबाच्या पलीकडे जाऊन, समाजाला आणि देशाला प्रेम देणं आणि त्यासाठी संघर्ष करणं". ग्लाडिस मॅकोझाच्या मातृत्वाच्या शक्तीने नेल्सन मंडेलाच्या जीवनात एका वैश्विक शक्तीचे रूप घेतले.

अशी ही मातृत्वाची संकल्पना एक वैश्विक शक्ती, अशी की ती सीमा ओलांडून मानवामध्ये, प्राण्यांमध्ये - अगदी साऱ्या विश्वात विविध स्वरुपात दिसून येते.

आई, माझी आई, तुझी आई
तोच ओलावा, तीच भावना
जे माझे क्षण, तेच तुमचे पण
माझा आहे संवाद, तसा तुमचाही असु दे संवाद
वाढविन तिचा वारसा, तसा असु दे तुमचाही वारसा
शतश: दंडवत जसे माझ्या आईला तसेच ते तुमच्या आईला ।।

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा

## मराठी शाळा - निबंध स्पर्धा

मराठी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतल्या निबंधापैकी निवडक ६ निबंध प्रत्येक महिन्यात १ हयाप्रमाणे, स्पर्धेसाठी जसे पाठवले गेले आहेत तसे, वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

**निबंध २**

**माझी आई- माझी प्रेरणा**

आई माझा गुरु, आई कल्पतरु
सुखाचा सागरु, आई माझी॥

आई हि आपली पहिली गुरु असते हे आपण सगळे जाणतोच. मग ती माय माऊली उच्च विद्याविभूषीत असो किंवा अडाणी. आपल्या कृतीतून ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आपल्या मुलांवर संस्कार करत असते. आई जवळ असो वा दूर तीच्या आठवणींचा ठेवा, तीचे गोड शब्द, तीचा उबदार स्पर्श, तीचे मार्गदर्शन किंवा तीचं नुसतं असणंही तीच्या लेकरांसाठी अनमोल ठेवा असतो.

आई तुझ्या कृपेने, दिन पाहिला सुखाचा
हा शब्दप्रपंच सारा,तुझीया कृतार्थतेचा॥

माझी आई, सौ. माया मानकर. तसं म्हटलं तर दहावी पास, पण आयुष्याच्या विद्यालयात अनेक पदव्या मिळवलेली माझी आई. अगदी लहानपणापासनं तीने तीच्या कृतीतून आम्हाला मानवता आणि आपुलकीचे धडे दिले. कधीही कुणाच्याही मदतीला धावून जाणे, कठीण प्रसंगांना धीराने सामोर जाणे, ही तर तीची खासियत. खळाळता उत्साह म्हणजे माझी आई. कंटाळा तर तीला माहितच नाही. तसंच अन्याय तीला कधी सहन झाला नाही. आपली आई काही सामान्य स्त्री नाही हे मला लहानपणापासून जाणवत होतं.

आईला स्वास्थ्य काही फारसं लाभलं नाही. मला कळायला लागण्या आधीपासूनच तीला तब्येतीच्या बऱ्याच तक्रारी असायच्या. मी सहावी - सातवीत असेन तेव्हाच तीचं पाठीचं फार किचकट आणि अयशस्वी ठरलेलं ऑपरेशन झालं. तेरावेळा पाठीतनं पाणी काढल्या गेलं होतं तीच्या. माझी दहावीची परिक्षा झाली आणि दुसऱ्याच दिवशी तीला पॅरलॅसीसचा तिसरा अटॅक आला. तीच्या शरीराला असंख्य वेदना होत्या. प्रत्यक्ष डॉक्टरांनी तीला अनेकदा म्हंटल्याचं मला आठवतं कि, “तुम्ही चालत्या बोलत्या आहात हे एक फार मोठं आश्चर्य आहे!” पण तीला कधी खचलेलं मी पाहिलं नाही. तीची जगण्याची जबरदस्त इच्छाशक्ती आणि कुठल्यातरी विशेष ध्येयप्राप्तीची ओढ एवढी

विलक्षण होती कि तीने प्रत्यक्ष मृत्युलाही अनेकदा हुलकावणी दिली. ते ध्येय होतं परमेश्वर प्राप्तीचं आणि सद्गुरु भेटीचं! तीच्या मनात हा भगवत् प्राप्तीचा अंकुर लहानपणापासनंच फुटल्याचं ती सांगते.

तीच्यातले कलागुण हा ही एक महत्वाचा भाग आहे. मी प्राथमिक शाळेत असतांना आई-बाबा नाटकात काम करायचे. आईतर दिग्दर्शनही करत असे. ते नुसती हौस म्हणुन जरी नाटक करत असले तरीही त्या दोघांचा अभिनय फार कसदार होता. एवढा कि आईला राज्यनाट्य स्पर्धेमध्ये "निष्पाप" या नाटकासाठी सर्वोत्कृष्ट नटी आणि दिग्दर्शिकेचं पारितोषिक मिळालं होतं आणि तेही सविता प्रभुणे यांच्या हातून! गाण्याचीही आवड तीला होतीच. पण तब्येतीच्या कुरबुरींमुळे हे सगळं मागे पडत गेलं. तीचं कलासक्त, संवेदनशील मन, तीची विलक्षण प्रतीभा आणि त्यात जर तीचं कवीमन जागृत झालं नसतं तरच नवल! १९९३ साली किल्लारी येथील भिषण भूकंपातून झालेल्या आत्यंतीक वेदनांतून तीच पहिलं काव्य प्रसवलं. काय ते व्याकुळ करणारे शब्द आणि काळजाला भिडणारी भाषाशैली! त्यानंतर मात्र तीच्या सामाजिक कवितांना जणू पूर आला. समाजातील आक्रोश, असमानता, समाजात होणारे एकुणच अत्याचार, त्याचप्रमाणे जे-जे म्हणून काही सुंदर, प्रांजळ तीच्या भोवती घडत होतं त्या-त्या सगळ्याच विषयी तीची संवेदनशीलता तीच्या लेखणीतून व्यक्त होत गेली.

आमच्या घरी लोकांचा गोतावळा हा नेहमीचाच होता. आई-बाबांनी खुप माणसं जोडली आणि हिच आपल्या जीवनाची खरी पुंजी असते हे त्यांनी मला शिकवलं. बाबांच्या संगीतप्रेमामुळे आणि आईच्या आध्यात्मिक रुची आणि एकुणच कलागुणांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील माणसे जोडली गेली. आधी उल्लेख केल्याप्रमाणे आईची सद्गुरु भेटीची इच्छा फळाला आली आणि प.पू. दत्ताभैय्या कुळकर्णी (दत्ताकाका) हे सद्गुरुरुपाने आईच्या आयुष्यात आले. श्री गजानन महाराज हे अवघ्या विदर्भाचे दैवत आणि आद्यगुरु.

त्यांच्या चरणी आईची श्रध्दा मुळातच दृढ होती आणि त्यांच्या गजानन विजय ग्रंथाचे पारायण सुरु असतांनाच दत्ताकाकांनी आईला प्रत्यक्ष दर्शन दिले. हा प्रसंग तीच्या तोंडून ऐकणे हे माझ्या विशेष आवडीचे.

आता तीच्या कवितांचा ओघ सामाजिक विषयांसोबतच आध्यात्मिकते कडेही वळला. सद्गुरु कृपेने आणि आज्ञेने तीने श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे जीवनचरित्र न वाचताच २१ काव्यसुमनांमधे माळले. त्यायोगे दृष्टांत, अनुभूती आणि गुरुकृपा कशाला म्हणतात याची प्रचीती आईला आली. तीचे संपुर्ण आयुष्यच रामनाममय झाले. पण तीची भक्ती डोळस होती. प्रकृतीच्या अनेक वर्षांच्या तक्रारींमुळे एका सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणेच तीनेही औषधपाण्या सोबतच बुवा-गंडे-दोरे याचा आधार घेतलाच होता. जेव्हा वैद्यकी उपाय थकतात तेव्हा अशा गोष्टींचा एक शेवटचा उपाय म्हणून नाईलाजाने आधार घेतला जातो. पण त्यामुळे अनेक बरे-वाईट अनुभवही तीला आले होते. जरी हे सगळं होऊन बराच काळ लोटला होता तरीही मनात शंकातर येतच होती. तीच्या मनाने सद्गुरुप्राप्तीचा एवढा ध्यास घेतला होता की भगवंताला तीची करुण हाक ऐकावीच लागली आणि तो दत्ताकाकाच्या रुपाने आईला भेटला. पण माझी याही वेळी फसवणूकतर होणार नाही ना? या विचाराने तीला ग्रासले आणि तीने प्रत्यक्ष गुरुं नाच तुम्ही खरे कि खोटे?, मी का तुम्हाला गुरु मानावे? असे परखड प्रश्नही केले. केवढी ती डोळस भक्ती! गुरु माऊलीच ती, दत्ताकाकांनी श्री गजानन महाराजांच्या रुपात आईला दर्शन देऊन तीच्या मनातील शंका दूर केल्या आणि आईनेही आपले जीवन श्री काकांच्या समर्पित केले.

त्यानंतर आईने अनेक संतांची चरित्रे काव्यस्वरूपात लिहिली, अभंगही रचले. तीच्या हातून झालेली सर्वात मोठी कामगिरी म्हणजे तीने केलेले "ज्ञानेश्वरीचे" सुलभ अशा मराठी भाषेतले ओवीबध्द रूपांतर होय. याही वेळेस आईने ज्ञानेश्वरी वाचलेली नव्हती. हे सगळं जरी कल्पनातीत वाटत असलं तरीही यालाच गुरुकृपा म्हणतात हेही तितकंच खरं आहे. मला तर तेव्हा फारच गंमत वाटली होती जेव्हा पुण्याहून एक ज्ञानेश्वरीवर पिएचडी करणारे गृहस्थ अनपेक्षितपणे आईला भेटायला आले होते. आईने ज्ञानेश्वरी ओवीबध्द केलीये हे त्यांना कुणाकडूनतरी कळलं होतं आणि आईचापण ज्ञानेश्वरीवर विषेश अभ्यास झालेला असेल असा त्यांचा समज असावा कदाचित. कारण आई दहावी पास आहे हे ऐकुन त्यांना अक्षरशः आश्चर्याचा धक्का बसला होता. मला तो प्रसंग अजूनही आठवतो. मी आठवी-नववीत असेन तेव्हा.

माझी आई फार शिस्तीची आहे. तीचा ओरडा खात-खातच मी मोठी झाले. आई सतत रागवते असं मला नेहमी वाटायचं, पण मोठी होता होता तीचं आणि माझं नातं अधिकच घट्ट होत गेलं. तीची प्रत्येक कृती हि माझ्या हिताचीच होती हे समजत गेलं. लग्न झालं आणि आईचं महत्व आणखीनच वाढत गेलं. आई-बाबांनी माझ्या सांगितिक प्रवासात मला नेहमीच खुप प्रोत्साहन दिलंय. आईने मला लिहायला प्रेरणा दिली. माझ्या प्रासंगिक कविता, लघुकथा किंवा माझ्याकडनं होणाऱ्या कुठल्याही लिखाणाचे आईने कौतुकही केले आणि एका समिक्षीकेप्रमाणे त्यावर टिका करुन सुधारणाही सुचवल्या. तीच्या कुठल्याही लिखाणाची मी पहिली श्रोता असते आणि ती माझी. आम्ही दोघी एकमेकींशी खुप वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारतो. पण आध्यात्म, नामस्मरण हा आमच्या आवडीचा विषय.


आई आता फक्त माझीच आई राहिली नसून ती अनेकांच्या लेखी मातृतूल्य झाली आहे. कित्येकांना तीने आपल्या मधूर वाणीने आणि सकारात्मक विचारांनी आधार दिलाय आणि एक जिव्हाळ्याचं नातं निर्माण केलंय. आज मी परदेशात आहे. माय लेकरांची ताटातूट झाली आहे. पण आपल्या पिल्लांना त्यांच्या पंखातलं बळ अजमावण्याची हिंमत ती सतत देत असते. आपली पिलं दूर उडून गेली आहेत अशी ती कधी तक्रार करत नाही. तीच्या विचारांची आणि संस्कारांची शिदोरी माझ्या पदराला घट्ट बांधून मी येथवर आली आहे. तीच्या कृतीतून माझ्यात झिरपत गेलेले संस्कार मी आता माझ्या लेकरांना कणभरही देऊ शकले तरी आयुष्याचे सार्थक होईल. आज मी माझ्या आईकडे फक्त माझी आई म्हणून बघत नाही, तर एक अशी व्यक्ती म्हणून बघते जी एक समृध्द आयुष्य जगतेय आणि अनेकांचे आधार तसेच प्रेरणास्थान आहे. अशा साक्षीभावाने आज मी तिच्याकडे बघू शकते हे मी माझं भाग्यंच समजते.

आई तुझ्या कृपेने, दिन पाहिला सुखाचा
आयुष्य सोहळा हा, तुझीया कृतार्थतेचा॥
तु माय माऊली माझी, मी पोटी तुझीया आले
छायेत वाढले तुझीया, मम भाग्य हे उदेले
तव चरणस्पर्श व्हावा, हा ध्यास एक मनीचा॥
आई तुझ्या कृपेने..........

- **अपर्णा झाडे, कॅलगरी, ॲलबर्टा, कॅनडा**

## 'कथा मराठी चित्रपटसृष्टीची – एक समृद्ध वारशाची अमूल्य झलक'

## महाराष्ट्र मंडळ अटलांटा



चित्रपट हा केवळ मनोरंजनाचं माध्यम नाही, तर तो काळ, परिस्थिती आणि माणसांच्या भावविश्वाचं जिवंत प्रतिबिंब असतो. ते मनाला भिडणारं, विचारांना चालना देणारं आणि संस्कृती जपणारं माध्यम असतं आणि या चित्रपटविश्वात आपल्या मराठी चित्रपटसृष्टीने गेल्या ११३ वर्षांमध्ये जी वाटचाल केली आहे, ती केवळ अभिमानास्पदच नाही, तर पुढच्या पिढ्यांसाठी जपून ठेवण्यासारखी आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून 'महाराष्ट्र मंडळ अटलांटा' तर्फे २०२५ च्या गुढी पाडवा कार्यक्रमात सादर करण्यात आला — एक आगळा-वेगळा, माहितीपूर्ण आणि नेत्रसुखद असा देखावा, जो मराठी चित्रपटसृष्टीचा सशक्त आणि समृद्ध इतिहास मांडतो.

आपल्या भारत देशात 'सिनेमाचा जन्म' मराठी माणसाच्या हातून झाला, हे अभिमानानं सांगण्यासारखं आहे. दादासाहेब फाळके यांनी ३ मे १९१३ रोजी प्रदर्शित केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा भारतातील पहिला मूकपट आजही चित्रपटसृष्टीच्या इतिहासात कोरून ठेवलेला आहे. मात्र, त्याही आधी १८ मे १९१२ रोजी दादासाहेब तोरणे यांचा 'श्री पुंडलिक' हा चित्रपट मुंबईच्या 'कॉरोनेशन सिनेमॅटोग्राफ'मध्ये दाखवण्यात आला होता – ही देखील तितकीच महत्त्वाची गोष्ट! यावरून एकच सिद्ध होतं – भारतीय चित्रपटाच्या वाटचालीची सुरुवात ही मराठी संस्कृतीच्या गर्भातूनच झाली होती.

💡 **संकल्पना आणि प्रेरणा:** या प्रकल्पाची बीजं पेरली गेली ती एक साधी कल्पना म्हणून — "मराठी चित्रपटसृष्टीची ११३ वर्षांची गोष्ट आपण एका ठोस, दृश्य माध्यमातून लोकांसमोर का मांडू नये?" सिनेमाची मोहिनी तर सर्वांवरच आहे आणि अनेक लोकांना आपल्या बालपणातील किंवा विशिष्ट दशकातील सिनेमांबद्दल अमूल्य आठवणी आहेत. या आठवणींना जपणारा, माहिती देणारा आणि अभिमान जागवणारा देखावा निर्माण करायचा, असं ठरवलं.

🔍 **संशोधन आणि अभ्यास:** या कल्पनेला मूर्तरूप देताना, सर्वप्रथम मोठ्या प्रमाणावर संशोधन आणि माहिती संकलन करण्यात आली. जवळपास २००० मराठी चित्रपटांची यादी बनविण्यात आली. १९१२ साली आलेल्या 'श्री पुंडलिक' पासून ते अगदी २०२५ पर्यंतच्या 'फसक्लास दाभाडे' पर्यंतच्या सिनेमांचा अभ्यास केला गेला.

यामध्ये फक्त चित्रपटांची नावेच नव्हे, तर त्यांचे दिग्दर्शक, अजरामर कलाकार, विनोदी कलाकार, आजचे आघाडीचे कलाकार, गाजलेले संवाद आणि मराठी चित्रपटांची यशोगाथा, या सगळ्यांचा समावेश करण्यात आला. तसेच सिनेमाच्या विविध टप्प्यांवर — मूकपट, सुवर्णयुग, मंदीचा काळ, नवउत्थान — असे विभाग तयार करून कालानुक्रमाने चित्रपट मांडायचे ठरवलं.

📝 **नियोजन आणि रचना:** एकूण ५० फूट लांबीचा देखावा उभा करायचा होता आणि त्यात वर्षनिहाय चित्रपटसृष्टीचा प्रवास दाखवायचा होता. त्यामुळे सुरुवातीला ठरवण्यात आलं:
पोस्टरचे आकार किती असावेत? त्यांचा रचना क्रम कसा असावा?
वर्षनिहाय विभागणी कुठल्या ठिकाणी बदलणार?

डिझाइनमध्ये चित्रपट, नायक-नायिका, दिग्दर्शक, विनोद अशा सर्व घटकांना समाविष्ट कसं करायचं?

या सर्व मुद्द्यांवर सखोल विचार करून एकूण  चित्रपटांचे सहा टप्प्यांमध्ये वर्गीकरण करण्यात आले:

१९१२-१९६० : मूकपट आणि सुरुवातीचे प्रवर्तक

१९६१-१९८० : सुवर्णकाळ

१९८१-१९९० : विनोद आणि स्टार पॉवरचा उदय

१९९१-२०१० : आव्हानं आणि बदलांचा काळ

२०११-२०२०: पुन्हा उभारी

२०२१-२०२५ : नव्या युगाची झेप

याशिवाय कलाकारांची स्वतंत्र विभागणी सुद्धा करण्यात आली — नायक, नायिका, विनोदी कलाकार, दिग्दर्शक, आणि नवतारके.

🖨️ **छपाई आणि साहित्य संकलन:** माहिती संकलन झाल्यानंतर पोस्टर्सची डिझाईन तयार केली गेली. त्यात चित्र, वर्ष, चित्रपटाचं नाव आणि थोडक्यात माहिती याचा समावेश केला गेला. सुमारे २००० चित्रपटांपैकी १००० चित्रपटांची पोस्टर्स खास निवडून छपाईसाठी पाठवली गेली.

प्रत्येक चित्रपटाचं पोस्टर ४ x ६ इंचाच्या आकारात छापलं गेलं, इतर चित्रे मोठ्या आकारात.

उच्च दर्जाचे प्रिंटिंग पेपर, आणि ६ x ३ फुटाच्या आकारात हलकं पण टिकाऊ माऊंटिंग बोर्ड वापरले गेले.

🧩 **लेआउट आणि सादरीकरण:** तयार पोस्टर्स आणि साहित्य मिळाल्यानंतर सर्वात मोठं काम होतं — त्याचं सादरीकरण. हे सादरीकरण करताना प्रत्येक चित्रपटांच्या वर्गीकरणासाठी स्वतंत्र पॅनेल्स तयार केले.

मधोमध दादासाहेब फाळके, दादासाहेब तोरणेंचे छायाचित्र, बाजूला 'चंदेरी दुनियेचे अजरामर नायक', 'रुपेरी पडद्याच्या गंधर्व नायिका', ‘चित्रपटसृष्टीचे शिल्पकार', ‘आताचे आघाडीचे नवतारू', 'मराठी चित्रपटसृष्टीतील प्रख्यात विनोदी कलाकार' आणि आपल्या 'मराठी चित्रपटसृष्टीची यशोगाथा' मांडली.

या सगळ्या तयारीसाठी दीड महिना लागला, परंतु संपूर्ण देखावा कार्यक्रमाच्या दोन दिवस आधी पूर्ण सज्ज करण्यात आला — याचे सर्व श्रेय जाते डेकोरेशन टीमच्या अथक परिश्रमांना!

🌟 **एक अमूल्य ठेव – पुढील पिढ्यांसाठी:** हा देखावा म्हणजे केवळ एक भित्तीचित्र नव्हे, तर आपल्या चित्रपटसंस्कृतीला वाहिलेली एक मन:पूर्वक मानवंदना आहे. यातून नव्या पिढीला आपल्या जडणघडणीतले हे अमूल्य क्षण पाहता, समजता आणि जपता यावेत, हीच आमची छोटीशी इच्छा. आज या देखाव्यामुळे अटलांटा वासीयांनी आपल्या इतिहासात डोकावलं, अनेकांच्या आठवणी जाग्या झाल्या आणि पुढील पिढ्यांपर्यंत आपली ओळख पोचली.

🌟 **"स्वप्न साकारताना..."** : “कथा मराठी चित्रपटसृष्टीची” या भव्य देखाव्याची संकल्पना, संशोधन, रूपरेषा, अभ्यास, डिझाइन, नियोजन, आणि संपूर्ण सादरीकरणाची प्रमुख धुरा श्री. सुनील देशपांडे यांनी सांभाळली. मराठी चित्रपटांचा ११३ वर्षांचा प्रवास रसिकांसमोर प्रभावीपणे मांडण्याच्या उद्देशाने त्यांनी हा देखावा साकारण्याचा संकल्प केला आणि त्यास मनापासून न्याय दिला.

या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र मंडळ अटलांटाच्या कार्यकर्त्यांनीही तितक्याच तळमळीने साथ दिली. या संपूर्ण प्रकल्पाच्या अंमलबजावणीत स्वप्ना कुमठेकर, स्नेहल सांगोळे, वैशाली साठे, अदिती बुचे, सुयोग बुचे, स्वाती वाईकर, ओमकार किणीकर, मिलिंद कुमठेकर, श्रुती कुमठेकर, ईशा कुमठेकर, अनुष्का देशपांडे आणि सुनिला देशपांडे – या सर्वांनी अत्यंत समर्पित भावनेने योगदान दिले. त्यांच्या मेहनतीतूनच हा देखावा वेळेत पूर्ण होऊन प्रेक्षकांसमोर सादर करता आला.

.... तर ही होती ‘कथा मराठी चित्रपटसृष्टीची’ आणि हा देखावा... म्हणजे अटलांटात उभं राहिलेलं एक 'सिनेमॅटिक टाईम ट्रॅव्हल'.

- **सुनिल देशपांडे,** महाराष्ट्र मंडळ अटलांटा

## BMM Texas मैत्री मेळाव्याचा वृतांत

नमस्कार मंडळी, चांगले उद्दिष्ट मनात ठेवून राबवलेला उपक्रम अपेक्षेपेक्षा किती जास्त सकारात्मक परिणाम घडवून आणू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९-२० एप्रिल रोजी अमेरिकेतील डॅलस शहरात पार पडलेला "बीएमएम टेक्सास मैत्री मेळावा".

हा आगळावेगळा, भव्य मैत्री मेळावा साजरा करण्यासाठी डॅलस नगरी सज्ज झाली आणि शनिवारी सकाळी या मैत्री मेळाव्याची दिमाखात सुरुवात झाली.



टेक्सास आणि जवळच्या राज्यांमधून १५०० पेक्षा अधिक मराठी रसिक या कार्यक्रमास उपस्थित होते. भरजरी, रंगीबेरंगी पैठण्या, नऊवारी साड्या परिधान करून, त्यावर अनुरूप दागिन्यांचा साज चढवून महिलांनी आपल्या उत्साहाला व्यक्तरूप दिले होते. पुरुष व चिमुकलेही पारंपारिक वेशभूषेत नटले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष प्रसाद पानवळकर आणि त्यांची कार्यकारी समिती, फ्रीस्को शहराच्या कौन्सिलसदस्या लॉरा रमल हे उद्घाटनासाठी आवर्जून उपस्थित होते.

त्याचबरोबर ऑस्टिन, ह्युस्टन, आणि सॅन अँटोनीओ महाराष्ट्र मंडळाचे प्रतिनिधीही हजर होते. डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा शामली असनारे यांनी हा "मैत्री मेळावा" हा सर्व कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचा परिपाक आहे हे प्रास्ताविकेत आवर्जून नमूद केले. या संपूर्ण दोन दिवसाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंयोजन मंडळाचे सचिव राहुल पाडळीकर यांनी केले. भारतीय दूतावास महासंचालक डी सी मंजुनाथ यांनीदेखील हजर राहून या मेळाव्याची शोभा वाढवली.

मैत्री मेळाव्याची सुरुवात 'राजा शिवछत्रपती' या शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाट्याने झाली. डॅलसचे सुजीत साठे यांनी लिहिलेले शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'राजा शिवछत्रपती' हे महानाट्य डॅलसच्या १२५ हून अधिक लहानमोठ्या कलाकारांनी दृकश्राव्य सादरीकरणाचा आणि प्रकाश योजनेचा प्रभावी उपयोग करीत सादर केले. साठेंच्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण निवेदनाने उपस्थितांसमोर स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या मावळ्यांचा इतिहास जिवंत झाला. उपस्थित लहान मुलांच्या तोंडीदेखील 'जय भवानी जय शिवाजी' या घोषणा ऐकून डॅलस फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाच्या परिश्रमांचे सांस्कृतिक पडसाद पुढच्या पिढीपर्यंत कसे नकळत पोहोचवले जात आहेत याची प्रचीती येते. या



नाट्यातील अभूतपूर्व राज्याभिषेक सोहळ्यानंतर प्रचंड उत्साहात ढोल ताशांच्या गजरात, गौरवयात्रेने या महानाट्याची सांगता झाली.

दोन दिवसाच्या मैत्री मेळाव्यात मनोरंजनाबरोबरच अनेक वैचारिक,समाजपयोगी आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या उपक्रमांची रेलचेल होती. रेशीमगाठी ह्या विवाहोत्सुक तरुणांच्या पालकांसाठी असलेल्या कार्यक्रमाचा लाभ अनेक युवक-युवतींना मनपसंत जोडीदार निवडण्यास होईल. रियल इस्टेट कनेक्ट मध्ये अमेरिकेतील रियल इस्टेट मधील संधींची ओळख करून देण्यात आली. बृहन्महाराष्ट्र मराठी शाळा संमेलन ह्या खास मुलांसाठी असलेल्या कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण झाले. बी-कनेक्ट ह्या खास व्यावसायिकांसाठी आखलेल्या कार्यक्रमाला टेक्सास मधील मराठी उद्योजकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. टेक्सास मधील मराठी डॉक्टर्ससाठी खास चर्चासत्रही ह्या मेळाव्यात आयोजित केले होते. श्री इडियट फेम ओमी वैद्य यांच्या स्टँड अप कॉमेडीचा रसिकांनी मनमुराद अनुभव घेतला. उत्तरंग ह्या खास ज्येष्ठांसाठी असलेल्या कार्यक्रमाचा ज्येष्ठांनी आस्वाद घेतला. स्थानिक कलाकारांच्या लघुनाट्य, नृत्यकथा, आणि सांगीतिक जियोपार्डी ने कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली.

मैत्री मेळाव्याच्या पहिल्या दिवसाची सांगता 'जर तर ची गोष्ट' या खास भारतातून आलेल्या नाटकाने झाली. प्रिया बापट, उमेश कामत, पल्लवी पाटील आणि आशुतोष गोखले यांच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली.

१५०० पेक्षा अधिक रसिकांसाठी दोन्ही दिवस चहा,नाश्ता आणि जेवणाची उत्तम व्यवस्था हे या कार्यक्रमाचे आणखी एक विशेष म्हणावे लागेल. ह्या कार्यक्रमाच्या यशामध्ये डॅलस आणि भारतातल्या दानशूर व्यक्तींचे आणि व्यवसायांचे योगदान आहे.

मेळाव्याच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात देवकी पंडित यांच्या सुमधुर गायनाने झाली. पंडित हर्षद कानेटकर ह्यांनी तबल्यावर साथ केली आणि एकल तबला वादनाने पंडित झाकीर हुसेन यांना श्रद्धांजली अर्पण केली. श्री अभिनय रवंदे यांनी संवादिनीवर साथ केली. प्रिया पाडळीकर यांचे सूत्र संचलन कार्यक्रमाला साजेसे होते.

मैत्री मेळाव्यातील सॅन अँटोनीओ आणि ह्युस्टन येथील मराठी बांधवांचा सहभाग आणि सादरीकरण खूपच वाखाणण्यासारखे होते. त्यांनी रसिकांची दाद मिळवली. मैत्री मेळाव्याची सांगता "गोष्ट मैत्रीची" या अतिशय वेगळ्या आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या कार्यक्रमाने झाली. लहान थोर अशा १०० पेक्षा अधिक कलाकारांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाने मैत्री मेळाव्याचे उद्दिष्टय सर्वांपर्यंत एका आगळ्या वेगळ्या पद्धतीने पोहोचवले. श्री. चैतन्य जोशी यांच्या संकल्पनेतून साकारलेली, सुंदर गोष्टींच्या गुंफणात विणलेली आणि मैत्रीच्या सर्व छटांची अलगद उकल करणारी ही कलाकृती रसिकांना खूपच भावली. त्यातील सर्व नृत्यही अतिशय उत्तम आणि समर्पक होते. सर्व कलाकारांनी अगदी जीव ओतून सादरीकरण केले.

दोन दिवस सर्व मराठी बांधव मैत्रीच्या सुंदर धाग्यात गुंफले गेले होते. या संपूर्ण मैत्री मेळाव्याचे नियोजन करण्यात मंडळाचे खजिनदार संतोष देशमुख, सहखजिनदार रश्मी थोपटे, आणि वेबमास्टर सचिन फुंदे यांच्याबरोबरच मेळावा कार्यकारी समितीचे सतीश थोपटे, अनुप शहापूरकर, सुजीत साठे आणि डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाचे ३०० पेक्षा जास्त कार्यकर्ते यांचे अमूल्य योगदान आहे.

**- शामली असनारे,** अध्यक्ष, डॅलस फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळ

## पुनःप्रारंभ

अंधारून गेलेलं
पाऊस कोसळत होता
मध्येच लख्ख प्रकाशून
वीज कडाडून उठत होती
कशीबशी छत्री सावरत घाबरून
मी चालत होते झपाझप घराकडे
सोसाट्याच्या वाऱ्यापुढे शरणागत होऊन
एक गुलमोहर विखुरला होता रस्त्यावर
त्याला पायदळी तुडवताना
मन ढवळून निघत होतं
निसर्गापुढे कुणाचं कधी चालतं का
आपले हात नेहमीच तोकडे
माझ्या मनात दुसऱ्या दिवशीही भिती
कालच्याच पावसाच्या तांडवाची
पण त्या गुलमोहराला मात्र
पुन्हा डौलात उभं राहिलेलं पाहिलं

\- **रोहिणी कुंभार,** फिनिक्स, ॲरिझोना

## अमेरिकेत श्री स्वामी समर्थ जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



अमेरिकेच्या विविध राज्यात श्री स्वामी समर्थ जयंतीचा उत्सव नुकताच संपन्न झाला. अमेरिकेतील स्वामी सेवेकऱ्यांनी श्री स्वामी चरित्र सारामृतांचे पारायण, पालखी मिरवणूक, आरती व विविध सेवांचे भव्य नियोजन केले होते. राज्य प्रतिनिधींनी नवीन भक्तांना स्वामी महाराजांच्या अवतार कार्याबद्दल माहिती दिली. बालसंस्कार चमूने देखील विविध उपक्रमांचे नियोजन केले होते. या मंगल प्रसंगी सेवेकऱ्यांनी हृदयस्पर्शी अनुभव सांगितले. कार्यक्रम अत्यंत आनंददायी वातावरणात श्री स्वामी समर्थ मंत्र आणि भक्तिगीतांसह संपन्न झाला.

प्रकाशन स्टॉलला प्रचंड प्रतिसाद मिळाला. गुरुपीठच्या प्राचीन दुर्मिळ ज्ञानाच्या ग्रंथांसोबत 'भारतीय सण ,व्रत वैकल्य', 'श्री स्वामी समर्थ सारामृत','श्री गुरुचरित्र' 'नित्यसेवा', 'बालसंस्कार' आणि 'कॅलेंडर' मुख्य आकर्षण होते. याशिवाय, मानवजीवनातील प्रश्न तसेच वैयत्तिक व कौटुंबिक समस्या संदर्भात विनामूल्य आध्यात्मिक मार्गदर्शन केले गेले.

वाचकांनी कृपया अमेरिकेतील आपल्या नातेवाईकांना आणि मित्रांना कळवावे व या संधीचा लाभ घ्यावा. अमेरिकेत स्वामी सेवेत तसेच विविध उपक्रमांमध्ये विनामूल्य सामील होण्यासाठी website द्वारे संपर्क साधू शकता.

shreeswamisamarthgurupeeth.org/

\- **श्री स्वामी समर्थ गुरुपीठ,** उत्तर अमेरिका

## रुबी हॉल क्लिनिक, पुणे

रुबी हॉल क्लिनिक, पुणे आणि अनिवासी भारतीय पालक संघटना – NRIPO मध्ये 'डॉक्टर्स व हॉस्पिटल्स ची वैद्यकीय सेवा' सामंजस्य करार ( MOU)."

पद्मभूषण डॉ. के. बी. ग्रांट यांच्या दूरदृष्टीने स्थापन झालेल्या पुण्यातील 'रुबी हॉल क्लिनिक' ने गेल्या ६५ वर्षांत लाखो रुग्णांची परिपूर्ण सेवा केली आहे. बदललेल्या जीवनशैलीतून उद्भवणाऱ्या आजारांवर प्रभावी उपचार करण्यासाठी अग्रेसर असलेल्या या 'रुबी हॉल क्लिनिक' मुळे पुण्याचे नाव जागतिक नकाशावर पोहोचले. पुण्यातील पहिले 'आयसीयू' सुरू करणारे 'रुबी हॉल क्लिनिक' रुग्णसेवेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यातही कायम आघाडीवर राहिले आहे. गेल्या काही दशकांत जागतिक पातळीवरील कर्करोगाचे वाढते प्रमाण पाहता, २००६ पासून 'रुबी हॉल क्लिनिक' मध्ये स्वतंत्र कॅन्सर केअर युनिटच्या माध्यमातून उपचार केले जातात. नुकतीच समाजातील वरिष्ठ जेष्ठ , नागरिकांसाठी 'RUBY HALL CLINIC GERIATRIC DIVISION' सुरु करण्यात आली आहे.

अनिवासी भारतीय पालक संघटना – NRIPO एनआरआयपीओ - ही १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्यातील पुणे येथे स्थापन झालेली एक स्वयंसेवी - ना-नफा - सामाजिक संस्था आहे; ज्या पालकांची मुले उच्च शिक्षणासाठी परदेशात गेली आहेत आणि त्यानंतर चांगल्या नोकरी / करिअरच्या संधींसाठी परदेशी स्थायिक झाली आहेत त्यांच्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

'नृपो' (नॉन रेसिडेंट इंडियन पेरेंट्स ऑर्गनायझेशन) ही पुणेस्थित संस्था परदेशात करियरसाठी स्थायिक झालेल्या मुलामुलींच्या भारतवासी पालकांसाठी कार्यरत असणारी संस्था आहे.



संस्थेला मोठा इतिहास व परंपरा आहेत. अजून एक यशस्वी पाऊल म्हणून ७ मार्च २०२५ रोजी NRIPO संस्थेचे अध्यक्ष श्री. बी.बी. कुलकर्णी यांनी पुण्यातील अद्ययावत् व अग्रेसर हॉस्पिटल रुबी हॉल क्लिनिक यांचेसमवेत एक 'न भूतो' असा सामंजस्य करार केला.

नृपोचे सर्व सभासद हे ज्येष्ठ, वरिष्ठ नागरिक असून या वयात सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे आजारपण व त्याचे निराकरण व त्यासाठी डॉक्टर्स व हॉस्पिटल्सची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून घेणे या अत्यंत महत्वाच्या बाबींवर NRIPO तर्फे पुढचे पाउल उचलले आहे. 'नृपो' सदस्यांच्या या समस्येवर तोडगा काढण्यासाठी हा करार करण्यात आला आहे.

या सोहळ्यात बोलताना डॉ. परवेझ ग्रांट प्रमुख हृदयरोगतज्ज्ञ, चेअरमन आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, रुबी हॉल क्लिनिक म्हणाले कि रुग्णांना रोगमुक्त करणे आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे, यासाठी आमचे कार्य सुरू असून, हीच ‘रुबी हॉल क्लिनिक’च्या वाटचालीची प्रेरणा आहे.

बेहराम खोडाईजी सीईओ या प्रसंगी बोलताना म्हणाले की रुग्णसेवेसाठी आयुष्य वेचणारे पद्मभूषण डॉ. के . बी. ग्रांट यांनी १९५९ मध्ये सुरू केलेल्या या ‘रुबी हॉल क्लिनिक’ मधे देश-विदेशातील अनेक रुग्ण उपचारांसाठी येत असून, गेल्या काही वर्षात हायब्रिड कॅथलॅब, बाय प्लेन कॅथलॅब सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कॅन्सर, हृदयविकार, पक्षाघाताच्या अनेक रुग्णांवर यशस्वी उपचार करण्याची परंपरा ‘रुबी हॉल क्लिनिक’ ने कायम राखली आहे. उर्वक्ष भोट, सीओओ, रुबी हॉल क्लिनिक दुर्धर आजार असेल तर तो तंत्रज्ञानामुळे लवकर समजतो आणि त्यावर उपचार करणे सोपे जावे आणि परिणामी रुग्णाचे प्राण वाचावेत, हाच उद्श ठेवून ‘रुबी हॉल’ गेली सहा दशके वैद्यकीय सेवा देत आहे. काळाप्रमाणे माणसाच्या खांद्याला खांदा लावून आज रोबोट शस्त्रक्रिया करतात, हे आपण ऐकतो. ‘रुबी हॉल क्लिनिक’ मध्ये सुद्धा रोबोटची काही क्लिष्ट शस्त्रक्रियांसाठी मदत घेतली जाते.

रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि संचालक श्री बेहराम खोदाजी, मुख्य व्यवस्थापक (व्यवसाय विकास) श्री. ऋषिकेश खांदवे व नृपोतर्फे अध्यक्ष श्री. बी. बी. कुलकर्णी व सचिव श्री. विद्याधर देशपांडे यांच्या संमतीदर्शक स्वाक्षरींने सदर करार (MOU) संपन्न झाला. नृपोचे सदस्य या सुवर्णसंधीचा आणि रुबी हॉल क्लिनिक तर्फे देत असलेल्या सर्व सेवांचा लाभ निश्चितपणे घेतील व निरामय आयुष्याचा आनंद लुटतील याबाबत खात्री आहे. अर्थात सर्वांच्या निरोगी आणि आनंदमय आयुष्यासाठी आम्ही प्रार्थना करतो. या करारान्वये प्राधान्याने हॉस्पिटल भरती, सवलतीच्या दरात आधुनिक वैद्यकीय सेवा, २४ तास रुग्णवाहिका, वैद्यकीय व लसीकरण शिबीरे इ. इ. सेवालाभ नृपो सदस्यांना मिळू शकतील. सदर करार करण्यात रुबी हॉल क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि संप्रेषण सल्लागार व्यवस्थापकीय सल्लागार व NRIPO चे सदस्य श्री. राजीव केतकर यांचा मोलाचा वाटा आहे.

रुबी हॉल क्लिनिक तर्फे “RUBY HALL CLINIC GERIATRIC DIVISION“ विभाग चालू करण्यात आला आहे. सर्व जेष्ठ, श्रेष्ठ, वरिष्ठ नागरिकांना विनंती पूर्वक निवेदन करण्यात येत आहे कि आपण या हेल्थ कार्ड साठी खालील लिंक वर आपली माहिती भरावी. हा फॉर्म निशुल्क आहे.

FORM LINK: https://forms.gle/59HoRmBkZbtHxx5Y9

(ह्या लिंक द्वारे अमेरिकेतील स्थायिक मंडळींच्या पालक आणि इतर जेष्ठ, वरिष्ठ सदस्य मंडळी जी भारतात राहतात अश्या सर्व मंडळींनी हा फॉर्म जरूर भरावा. ).

रुबी हॉल क्लीनिक या आधुनिकतेची कास धरणाऱ्या हॉस्पिटलतर्फे डॉ परवेज ग्रान्ट, डॉ प्राची साठे, बेहेराम खोदाईजी आणि सचिन दंडवते यांनी बी एम एम २०२४ च्या अधिवेशनात अत्यंत सक्रिय उपस्थिती दर्शविली. आज कुठल्याही जागतिक दर्जाच्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये असतील अशा अनेक उपचार पद्धती इथे उपलब्ध आहेत, अतिजलद MRI , सीटी स्कॅन, PET scan मधील अत्याधुनिक तंत्रज्ञान, सायबर नाइफ, Heart Transplant, Bone Marrow Transplant, Joint Replacement आणि इतर उपचारामध्ये वैद्यकीय ज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये कुठलीही दरी राहू नये यासाठी रुबी हॉल नेहमीच प्रयत्नशील आहे. आमचे मराठी बांधव आणि त्यांचे कुटुंबीय यांना विशेष पद्धतीने उपचार मिळावेत म्हणून आम्ही कार्यरत आहोत. त्यासाठी अनेक निरनिराळ्या योजना आम्ही आखल्या आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी बेहराम खोदायजी यांनी सांगितले. स्पेशल हेल्थ कार्ड प्लॅन्स, विसा, मेडिकल हेल्थ चेक, इलेक्टिव्ह सर्जरी , डेंटल वर्क्स. सांध्यांसाठी इम्प्लांट सर्जरीज, इमर्जन्सी सपोर्ट इन इंडिया. Concierge सर्विसेस. टेलेमेडिसीन कन्सल्टेशन्स असे अनेक उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी अधिक माहिती साठी संपर्क-

Ruby Hall Clinic पुणे. www.rubyhall.com

Email- ushealthconnect@rubyhall.com,

Yogesh Lekawale yogesh.lekawale@rubyhall.com

Phone: +919422310505 +917757004951,

+919175916567

# महाकुंभ

महाकुंभासाठीच्या दीर्घ आणि प्रतीक्षित प्रवासानंतर, भारतवासी थोरल्या बंधूंसमवेत, अखेरीस प्रयागराजला पोहोचलो. अगदी ठरल्याप्रमाणे, महाशिवरात्रीच्या शाहीस्नानाच्या एक दिवस आधी.

पवित्र नद्यांच्या किनारी खास महाकुंभासाठी उभारलेल्या तंबूंच्या शहरात पोहोचणं हे एक दिव्यच होतं. केवळ पाच सहा किलोमीटर अंतर पार करण्यासाठी जवळजवळ तेवढेच तास लागले. चार चाकी गाडीतून दोन चाकींवर, हातात असलेल्या कपड्यांच्या गाठोड्याला कसरत करत सांभाळतानाचा प्रवास; तेही उत्तर प्रदेशच्या पोलिसांच्या संरक्षणात जाणाऱ्या अति महत्त्वाच्या (???) व्यक्तींच्या ताफ्याला सामावून घेताना निर्माण होणाऱ्या अनेक वाहतूक अडथळ्यातून मार्ग काढत. रस्त्यातून त्रिवेणी संगमाच्या दिशेने मैलोन्मैल चालत आणि ईश्वरनामाचा गजर करत चालणाऱ्या सर्वसामान्य भक्तगणांना cross करताना पंढरीच्या वारकऱ्यांची आठवण होण साहजिकच होत.

त्यानंतर पुढची पायरी म्हणजे सेक्टर २५ मधील तंबूतून संगम घाटावर पोहोचणे. थोड्याशा अंतरासाठी हजारो रुपये खर्च करीत एका मोटरसायकलवरून तीन व्यक्तींचा प्रवास, हे नमूद करायलाच हवं. नंतर छोट्या नावेत चढण्यासाठी गुडघ्यापर्यंत चिखलभर पाण्यातून चालावे लागले. तिथेही पुन्हा दरडोई काही हजार रुपये मोजा. यासारख्या शेकडो बोटी प्रत्येकी १०-१२ यात्रींना प्रत्यक्ष संगमावर पवित्र डुबकी मारण्यासाठी नेऊन आणि परत आणून सोडत होत्या. थोड्याशा अंतरावर जाण्यासाठी वाजवीपेक्षा जास्तच पैसे मोजावे लागत होते पण सोय होती हे महत्त्वाचं.

गुडघाभर चिखलातून बोटीपर्यंत चालत गेल्यावर बोटीने संगमापर्यंत जाण्यासाठी नावाड्याला पैसे देणे आवश्यक होतेच . पण ते असल्यामुळे आपण डुबकीचा आनंद घेऊ शकत होतो! त्रिवेणी संगमात मारलेली पहिली डुबकी अत्यंत भावनाशील होती. हजारो भाविक वातावरणात spiritual ऊर्जा निर्माण करत होते तर एकीकडे सूर्य अस्ताला जात होता. एक उदात्त आशीर्वादच जणू प्राप्त होत होता.

रूपा, माझी ह्युस्टन मधील मैत्रीण, तिच्या माता-पित्या सह महाशिवरात्रीच्या आदल्या संध्याकाळी आली. पुढील दिवस होता महा कुंभाचा अंतिम दिवस- महाशिवरात्र. अतिशय प्रसन्न सकाळ. आम्ही पाच जणांनी तंबूंपासून सेतूपर्यंत रिक्षा केली आणि गंगेच्या दुसऱ्या तीरावर गेलो. मोटरसायकलवरून तिघा तिघांनी प्रवास करीत त्रिवेणी संगमाच्या किनाऱ्यावर पोहोचलो. आणि मग बोटीतून गंगा-यमुना-सरस्वतीच्या संगमाच्या प्रत्यक्ष स्थानावर जाऊन पोहोचलो.



या शुभ दिनी पृथ्वीवरील सर्वात अध्यात्मिक धार्मिक स्थळ होतं ते! आमच्यासारखाच विश्वास असलेले अनेक लोक आजूबाजूला असतानाच आम्ही एक पवित्र डुबकी मारली आणि आत्म्याच्या पावित्र्यासाठी लागणारी सर्व क्रियाकर्मे केली .

आयुष्यातील एक अतिशय अविस्मरणीय दिवस! एकंदरीत यात्रा मात्र उत्तम झाली.

पैसे देऊन तरी सुविधा होत्या आणि त्या एवढ्या मोठ्या समुदायाच्या गरजा पुरवत होत्या याच महत्त्व मला फार वाटलं, कारण त्यामुळे लाखो लोकांना कुंभमेळ्यात स्नान करणे शक्य झाले. एकंदरीत, सर्वसाधारण व्यवस्था अतिशय वंदनीय होती. योगी सरकारला शतशः प्रणाम.

या यात्रेच्या शेवटच्या दिवशी भेटलेल्या एका गावंढळ वाटणाऱ्या अनामिक आणि अज्ञात अशा देवपुरुषाबरोबर झालेल्या भेटीबद्दल सांगायलाच हव. संगमात शेवटची डुबकी मारून, मोटरसायकल वरून, तंबूत येण्यासाठीच्या परतीच्या प्रवासात तुडुंब गर्दीमध्ये माझा फोन कुठेतरी पडला. थांब्यावर येईपर्यंत माझ्या ते लक्षातही आलं नाही.

त्या फोन नंबर वर फोन करायचा प्रयत्न केला पण उत्तर मिळालं नाही. काही तासानंतर मी पुन्हा फोन केला आणि एका प्रौढ ग्रामस्थाने माझ्या फोनला उत्तर दिलं. तो बिचारा, 'फोन कोणाचा आहे ते शोधून त्या योग्य व्यक्तीकडे कसा पोहोचवता येईल', या विवंचनेत होता.

दुसऱ्या दिवशी आपल्या मुलाच्या बाईकवरून,चाळीस किलोमीटर पेक्षा जास्त प्रवास करून, उन्हातान्हात मला फोन देण्यासाठी तो उभा होता.

अशा अनामिक देवपुरुषाचे दर्शन झाल्याबद्दल मी स्वतःला भाग्यवानच समजतो. फोन पडला नसता तर मी या दर्शनाला नक्कीच मुकलो असतो. या दर्शनानंतर त्या भागातील इतर कोणत्याही देवळात जाण्याची आवश्यकताच उरली नाही माझ्यासाठी!

**- रणजित कामत,** हयूस्टन, टेक्सास

## शुभं करोती कल्याणम

संध्याकाळची वेळ होती. दिवे लागणीची चाहूल मावळत्या सूर्याने पाठवली होती. त्या पावलांनी लक्ष्मी घरी येते अशी धारणा समाजमान्य आहे. मी ही त्या लक्ष्मीची आळवणी करण्याच्या हेतूने आपल्या देवघरात एक छोटा दीप प्रज्वलित केला. बाजूला एक उदबत्ती दिसली. तिला पण प्रज्वलित केले. त्या दीपकाने देवघरातील मूर्त्यांवर आपली कोमल किरणे अशी पांघरली कि त्या प्रत्येक मूर्तीला जणू सुवर्ण स्पर्श मिळाला असे भासत होते. त्या सुवर्ण स्पर्शाला मधुर धूप सुगंध अजून मोहक बनवत होते. ह्या क्षणभंगुर जीवनातील हे काही रज कण माझ्या मनाला मोहले. आमच्या घरची रीत सायंकाळी शुभम करोति, रामरक्षा व मारुती स्तोत्र पठण करण्याची असल्याने मी त्या नियमाचे पालन केले व हळुवार आवाजात ते नित्य कर्म उरकले.

मावळत्या सूर्याने निसर्ग विविध रंग छटांनी नटवले. ते मोहक दृश्य पाहण्यासाठी मी गॅलरीत गेलो. डोळे त्या मावळत्या किरणांच्या चित्रकलेवर खिळले. नेत्र सृष्टी चित्रात गुंतले असताना कर्णावर एक गीत नाचू लागले. शेजारी मोने काकू भुले बिसरे गीत ऐकत होत्या. आई पण बाहेर चहा व खारी घेऊन आली. आज मेजवानी आहे इंद्रियांची. आई व मी मस्त गरम चहा पीत ते गीत ऐकत बसलो. आम्हा दोघांना शाब्दिक संभाषण करण्याची गरज भासली नाही. अश्या त्या निवांत क्षणी एक गीत मला गुदगुल्या करून गेले .

रम्य ही स्वर्गाहून लंका ,
हिच्या कीर्तीच्या सागर लहरी नादविती डंका ।।१।।
सुवर्ण कमला परी ही नगरी, फुलून दरवळे निळ्या सागरी
त्या कमळावर चंद्र निजकरे करतो अभिषेका ।।२।।
लक्ष्मी लंका दोघी भगिनी , उभय उपजल्या या जलधितूनी
या लंकेचे दासी पद तरी कमला घेईल का ? ।।३।।

रम्य ही स्वर्गाहून लंका - मला विचार आला की या क्षणी मी निवांत चहाचे झुरके घेत निसर्ग सौंदर्याचा आनंद माझ्या प्रिय व्यक्ती बरोबर घेत बसले हे पण स्वर्गीय सुखासमान नाही का? मग विचारात पडले कि लंका हा देश - अर्थात लोकेशन मानले तर माझी लंका हि गॅलरी व त्यात हा प्रसंग. माझे मन रमले ह्या लंकेत. आईला माझ्या मनात रचलेल्या या लंकेचे वर्णन केले. तिने पण ते आनंदाने ऐकले.

आई म्हणाली जरी तुझा विचार योग्य असला तरी संपूर्ण गीत त्यात बसत नाही. हम्मम .... मग तू प्रयत्न कर ना. आई ती आई शेवटी. सगळ्यांना पुरून उरते. तिने तडक उत्तर दिले. समजा लंका तुझे किंवा माझे देह अर्थात शरीर मानले तर ...

मी पण विचार करू लागलो कि माझा देहाला लंका मानले तर त्यातील सर्व अवयव हे छोटी छोटी नगरं असतील . प्रत्येक अवयव स्वयंचलित आहे व इतर अवयवांबरोबर त्यांचे व्यवहार आहेत. विचार केला तर खरंच सोन्याची लंका आहे. सुवर्ण कमल हे निर्मलतेचे प्रतीक मानले जाते आणि अध्यात्मिक विश्वात ही मान्यता आहे कि नर देह दुर्लभ. देव, किन्नर सर्व या नर देहाच्या प्राप्तीस उत्सुक असतात. मग माझे काही तरी पुण्य संचय असावे कि मला या जन्मी ते लाभले. माझे शरीर पण ७०% जल तत्त्वाने युक्त आहे आणि मी जर मला दिलेल्या दुर्मिळ संपत्तीची निगा नीट राखली तर तोच माझ्या करवी या कमळावर झालेला अभिषेक नाही का ?

हेल्थ इज वेल्थ ही समाजमान्य शिकवण आहे. आज सर्वत्र फास्ट फूड, इन्स्टंट फूड या नावाखाली आपली आरोग्य संपदा लुटली जात आहे. रोज पेपरात व टीव्हीवर येणाऱ्या त्या जाहिरातीतून कधी तरी खाव्या अश्या पाक वस्तूंचे प्रसारण केले जाते. रोज बघून बघून मी पण कधी तरी मोहात पडतो व ते पक्वान्न मागवतो. जीवन फास्ट झाले व जेवण त्याहून फास्ट. घरचे भोजन आता दारी येणाऱ्या जेवणापुढे फिके पडले. घरची भाजी भाकरी दारच्या वंगण लावलेल्या चटक मटक खाद्यापुढे कोमेजली. घरच्या अन्नपूर्णेचे सत्व गुणाने युक्त भोजन हे परगृही व्यावहारिक वृत्तीने बनवलेल्या जेवणामुळे परके झाले. माझा लेक कॉलेजात मित्रांबरोबर कॅन्टीन मध्ये रोजचे जेवण जेवणे कूल समजतो. हि आई नामक अन्नपूर्णेने बनवलेल्या सात्विक भोजनाने पोषित देहाची सुवर्ण कमलापरी फुलवलेली नगरी आरोग्य संपदेने दरवळत होती ती आता कॅन्टीनच्या व्यावहारिक भोजनाने कोमजत आहे.

खरं तर विचार केला तर घरची खिचडी कढी व दारची खिचडी कढी यात काय फरक आहे ? घरी पण डाळ तांदूळ फोडणीने खिचडी बनते व दारी पण तेच धान्य वापरले जाते. मग मेसमध्ये महिनाभर खिचडी खाल्ल्यावर त्या खिचडीचा कंटाळा येतो पण वीस वर्ष आईच्या हातची खिचडी खाऊनही कंटाळा येत नाही. असे काय आहे त्यात जे बाजारच्या खिचडीत नाही?

माझ्या दृष्टिकोनातून दोन्हीत वैचारिक बैठकीत फरक आहे. घरची अन्नपूर्णा जेव्हा भोजन करायला घेते तेव्हा तिची विचारधारा ही तिच्या पाल्यांना अर्थात घरच्या सर्वांनाच स्वास्थ्य वर्धन घडावे ही असते. तेथे व्यवहार नाही. आई आपल्या बाळाला पौष्टिक असे अन्न बनवण्याच्या उद्देशाने प्रयत्नशील असते. इथे सर्वांचे हितचिंतन आले. तिला कोणाचेही अहित चिंतायची गरज भासत नाही. अन्नपूर्णेच्या हातून हि क्रिया निःशुल्क सेवा या भावनेतून घडत असते. पण जेव्हा व्यवहार येतो तेव्हा हित हे स्वहित असते. ते भोजन हे पोषणापेक्षा अर्थार्जन या उद्देशाने केले असल्याने तो पदार्थ आरोग्यदायी व्हावा असा प्रयत्न तेथे नसतो.

भात भाकरीतून मिळणारे कार्बोहैड्रेट्स (कर्बोदके) जठराग्नी शीतल करतात तर उसळी, वरण हे प्रथिने शक्ती प्रदान करतात.

त्यावर घेतलेले तूप हे ओजस वाढवतात. भाजी प्राण वर्धन करते तर भोजन उपरांत घेतलेले जल जठराग्नी उत्तेजित करते. क्रियाच ती, आपोआप घडणार.

अन्नपूर्णेचे भोजन आपण सात्विक मानतो कारण ती आपल्या घराला जे पाचक तेच योग्य प्रमाणात संमिश्रित करून भोजन बनवते. त्यामुळे वर्षानुवर्षे तेच पदार्थ खाऊनही कोणी आजारी पडत नाही. प्रत्येक घरची खिचडी कढीची चव वेगळी असते. या कमळावर अर्थात माझ्या या सात्विक पौष्टिक अन्नाने आरोग्य संपन्न केलेला देह मी माझ्या परीने प्रयत्न करून निरोगी ठेवला तर तोच माझ्या हातून घडलेला अभिषेक नाही का ?

आरोग्य हि संपदा आहे जशी लक्ष्मी हि संपन्नतेची देवता आहे तशीच. मी माझ्या शारीरिक आरोग्याची निगा राखली तर वैचारिक, व्यावहारिक, लौकिक अश्या सर्व प्रापंचिक संपदा ती संपन्नतेची देवता मला प्रदान करेल ना? जीव आहे तोवर जीवनाचा आनंद उपभोगता येतो हे सत्य आहे. पण शारीरिक आरोग्य मला लाभले तर तो आनंद मला लुटता येतो. या विचारधारेवर मला इतका सुंदर अर्थ बोध दिल्याबद्दल मी माझ्या आई व गुरुमाऊली श्री मंगलनाथ महाराजांच्या चरणांवर मनोभावे माझे मस्तक ठेवले.

आमच्या घरच्या आई व बायको नामक अन्नपूर्णेच्या स्वरूपांना वंदन मी केले. या परिवारातील प्रत्येक नरदेह नामक लंका हि सुवर्ण कमलाप्रमाणे दरवळत आहे कारण आमच्या देहाच्या पोषणाच्या गरजा समजून आमच्या स्वयंपाकघरात स्वयंपाक बनवून त्यांनी हा वंशवेल सुदृढ व सुसंपन्न केला आहे. या उत्तमोत्तम विचारधारे वर 'शुभम करोति कल्याणम आरोग्यम धन संपदा' .... या नित्य पाठाचा खरा अर्थ कळला.

**- सुलक्षणा कुळकर्णी**

## My Holi Party

My class was given an assignment to present 'Celebration of Holi'. Myself and my 3 classmates talked on these topics -

**History:** Holi is a vibrant festival of colors. It is celebrated at the beginning of Spring season to show how good wins over evil.

**Traditions:** In India, Holi is celebrated by throwing colorful powders and water on your friends and sometimes relatives.

**Food:** In Maharashtra they eat Puran Poli and other delicious dishes. Karanji and Thandai are very popular in other parts of India.

**Fun Facts:** Sometimes people play pranks - tricking and suddenly surprising others by smearing colors on them. But on this holiday, no one gets angry at each other!

Few years ago, me and my mommy went to a place where you could throw color powder on people. My brother stayed home with my Daddy. I wonder why because he would not miss the opportunity to throw color at people. He already uses me as a punch bag!

My mommy and I decided to celebrate this year's Holi by throwing a party for my classmates. They were all eager to see how we would play with color powders. About 8 to 10 friends came over on April 27th. My holi party was the best. We did everything I ever wanted to do. First we put henna tattoos on each other. I have not had henna in a long time so it was really exciting for me! One more colorful activity was rock painting. Finally came the part that everyone was waiting for... holi powder throwing!!! We all had a blast running around and throwing powder at each other! No one wanted to stop! Everyone kept taking handfuls of powder and throwing it, until all the powder was gone. But we didn't want to stop so we started trying to take the powder from the ground and using that! After everyone was done throwing powder, we all looked really crazy. We had lots of Indian food for people to try! We had pulao and dal. I loved my holi party. It was worth setting up and waiting for weeks!

**- Maya Mangrulkar, Florham Park, NJ**
**Age 9**






Brihanmaharashtra Mandal (North America)

Presents

# जीना इसी का नाम है !

*Live Life Meaningfully*

## दीपस्तंभ मनोबलचे यजुर्वेंद्र महाजन यांचा व्याख्यानांचा अमेरिका दौरा !

दीपस्तभ मनोबलचा रंजक प्रवास... सोबत दिव्यांग, अनाथ विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी गोष्टी, गाणी, व नृत्यांचे विशेष व्हिडिओज्.

कृपया शेजारी दिलेल्या शहरांमध्ये निवास असणाऱ्या आपल्या मित्र अथवा नातेवाईकांचे ई-मेल, व्हाटस्अॅप नंबर व राहत असलेलेल्या शहराचे नाव पाठवा. त्यांना कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती पाठवण्यात येईल.

**Tel #** 814-973-0319 **Email:** deepstambhngo@gmail.com



| Date | City |
|---|---|
| 1 to 5 April | Seattle |
| 6 to 10 April | San Francisco |
| 11 & 12 April | Los Angeles |
| 13 to 16 April | Phoenix |
| 17 April | Denver |
| 18 & 19 April | Dallas |
| 20 April | Chicago |
| 21 April | Indianapolis |
| 22 & 23 April | Austin |
| 24 to 26 April | Pittsburgh |
| 27 to 29 April | Boston |
| 30 April | Hartford |
| 1 May | New York City |
| 2 May | Philadelphia |
| 3 May | New Jersey /Philadelphia |
| 4 May | Baltimore/Washington DC |
| 5 to 7 May | Washington D C |
| 8 to 12 May | Amsterdam, Netherlands |

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Golden Gate***

**Artist: Alka Vaidya**

Dimension: 12″ x 16″
Medium:watercolor
Price : $250
Mandal: MMBA



***HaldiKunku***

**Artist: Amita Rajadhyaksha**

Dimension: 24″ x 36″
Medium:Acrylic
Price : $1200
Mandal: MMLA



***Vaishali***

**Artist: Swaroop Ranadive**

Dimensions: 31″ x 43″
Medium: Acrylic on canvas
Price: $3,980 including frame
Mandal: MMLA



***Zatracha Nandi***

**Artist: Supriya V.**

Dimensions:40″x50″
Medium: Oil on Gallery wrap Canvas
Price: $899
Mandal:



**Artist: Chitra Juvekar Mehendale**

Dimensions:2′ x 3′
Medium: Acrylic
Price:Not for Sale
Mandal:



***Grace***

**Artist: Kanchan Tare**

Dimensions:14″x14″
Medium: mix media ( Lippan art)Acrylic on canvas with clay and mirrors
Price:$450
Mandal: NEMM

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.